महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- इलेक्ट्रिकल वायरमन
- टू-व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- ॲटोमोबाईल टेक्निशियन
- मोटार वायडिंग
- फोर व्हीलर मेकॅनिक
- वेल्डर / प्लंबर
- कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...

व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ११० वा | बुधवार, दि.२६ नोव्हेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

## मोहोळ शहराच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासाचे व्हिजन राबवण्यासाठी भाजपाला संधी द्यावी : शितल सुशील क्षीरसागर

### मोहोळ शहराच्या पूर्व भागात नगराध्यक्ष पदाच्या भाजपा उमेदवार शितल सुशील क्षीरसागर यांची जनसंवाद रॅली





**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** गेल्या काही दिवसापासून सुरू असलेल्या नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने सर्व सामान्य बंधू-भगिनींशी मोठ्या प्रमाणात संपर्क आणि व्यापक स्वरूपात चर्चा देखील झाली. शहराच्या कानाकोपऱ्यातील सर्वसामान्य मतदार बंधूभगिनींचे बहुमोल आशिर्वाद आणि प्रेम लाभले. सर्वसामान्य मतदार बंधू-भगिनींची आपुलकी आणि जिव्हाळा यामुळे निश्चितपणे मी भारावून गेले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सार्थ नेतृत्वाखाली जिल्ह्याचे पालकमंत्री तथा ग्रामविकास मंत्री नामदार जयकुमारभाऊ गोरे, भाजपचे ज्येष्ठ नेते राजन पाटील यांनी यापुढील काळातील सोलापूर जिल्ह्याच्या विकासात्मक वाटचालीची जबाबदारी भारतीय जनता पक्षाने घेतली आहे. मोहोळ शहराच्या सर्वांगीण विकासाचा टप्पा पूर्ण करण्यासाठी तुम्हा सर्वांनी संधी दिल्यास निश्चितपणे भाजपाचे शाश्वत विकासाचे व्हिजन राबवण्यास मोठा हातभार लागेल असे आवाहन भारतीय जनता पक्षाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार शितलताई सुशील क्षीरसागर यांनी केले.

> देशाचे पंतप्रधान ना.नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात भाजपा सरकारने केलेल्या विकासकामांमुळे, पारदर्शक कार्यपद्धतीमुळे आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमान उंचावण्याच्या प्रयत्नांमुळे जनतेच्या मनात भाजपाबद्दल प्रचंड विश्वास निर्माण झाला आहे. या रॅली दरम्यान नागरिकांनी देऊ केलेला आशीर्वाद हा भाजपाच्या विजयी पताकेला बळ देणारा आहे. मोहोळ शहराच्या प्रचाराच्या दुसऱ्या टप्प्यात भाजपाने निर्णय आघाडी घेतली असून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शीतल क्षीरसागर यांच्यासह सर्वच्या सर्व दहा प्रभागातील वीस उमेदवारांना प्रचारादरम्यान मोठा आणि सकारात्मक स्वरूपात मिळत असला पाठिंबा येत्या काळातील भाजप कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवणारा ठरत आहे.
>
> **– सुशील भैय्या क्षीरसागर,** मोहोळ निवडणूक प्रभारी भाजप

मोहोळ नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचार आणि जनसंवाद रॅलीच्या निमित्ताने मोहोळ शहराच्या पूर्व भागात शितलताई क्षीरसागर यांनी प्रचार दौरा पूर्ण केला यावेळी त्यांनी प्रभागातील अनेक ज्येष्ठ कनिष्ठ मंडळींशी संवाद साधत त्यांच्याशी निवडणुकीच्या बद्दल आणि विकास कामांबद्दल अत्यंत सकारात्मक शैलीने चर्चा देखील केली. यावेळी प्रभाग क्रमांक २ मधील उमेदवार आबासाहेब रेवणसिद्ध आंडगे व लक्ष्मी संतोष खंदारे यांच्या समवेत आयोजित केलेल्या जनसंवाद रॅलीला नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

याप्रसंगी युवा नेते सोमेश क्षीरसागर, निवडणूक प्रभारी सुशील क्षीरसागर, ज्योती सोमेश क्षीरसागर, भाजपा अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष संजीव खिलारे, प्रदेश कार्यकारणी सदस्य शंकरराव वाघमारे, युवा नेते,सोमेश क्षीरसागर, छगन अष्टुळ, रावसाहेब चोरमोले, पंकज असवरे, प्रवीण सोनवणे, नवनाथ चव्हाण, द्रोणाचार्य लेंगरे, सागर लेंगरे बबन शिंदे, भारत कटके,नारायण शिंदे,सुरेखा खंदारे, नलिनी असवरे, लीना वायदंडे यांच्यासह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## स्थानिक अस्मितेच्या मुद्द्यावर शिवसेनेच्या प्रभाग १ बालेकिल्ल्यात सत्यवान देशमुख आणि स्वप्नाली जाधव यांचा विजय निश्चित

### प्रचंड जनसंपर्काच्या मशालीच्या प्रचाराच्या झंझावाता पुढे सर्वपक्षीय विरोधक अक्षरशः हतबल

### ज्येष्ठ नेते दीपक गायकवाड यांच्या चाणाक्ष रणनीतीमुळे प्रभागात शिवसेनेची सरशी



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ शहरातील राजकीय जडणघडणीचा गेल्या ४० वर्षापासून चा केंद्रबिंदू असलेल्या प्रभाग क्रमांक एक मधील लढतीकडे संपूर्ण शहराचे नाही तर तालुक्याचे लक्ष लागले आहे. या प्रभागातून शिवसेना उमेदवारीची मशाल कोणाच्या हातात देणार ? आणि कोणता शिवसेनेचा शिलेदार या प्रभागाचे नगर परिषदेत नेतृत्व करणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. या प्रभागातून सर्वसाधारण प्रवगार्तून माजी नगरसेवक सत्यवान देशमुख यांना तर ओबीसी महिला प्रवगार्तून युवा उद्योजक सचिन जाधव यांच्या सुविद्य पत्नी स्वप्नाली सचिन जाधव यांना उमेदवारी देण्यात आली आहे. शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या या प्रभागात शिवसेना उबाठा पक्षाच्याच उमेदवारांना मोठा प्रतिसाद मिळत असून त्यांचा विजय आता निश्चित मानला जात आहे.

युवा नेते सचिन जाधव यांचा प्रभागातील मोठा जनाधार आणि निर्णायक वोट बँक लक्षात घेता दोन्हीही उमेदवारांना उमेदवारीची



घोषणा होताच या प्रभागातील शिवसेना पक्षाचे पारडे मजबूत झाल्याचे त्याचवेळी सर्वांना जाणवले होते. त्यामुळे प्रचाराच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात मिळत असलेल्या जोरदार प्रतिसादामुळे या प्रभागातील मशाल चिन्हाच्या वाढत्या प्रभावाची चिंता सर्वपक्षीय विरोधकांना आता चांगलीच वाटायला लागली आहे. बऱ्याच जणांना आतापासूनच मशालीला मिळत असलेला पाठिंबा स्पष्टपणे जाणवत असल्यामुळे आतापासूनच गर्भगळीत झाले आहेत.

> जाधव परिवारातील सचिन जाधव आणि धनाजी जाधव या बंधूंच्या सामाजिक कार्याच्या माध्यमातून प्रत्येकाशी नित्यसंवाद असलेला हा हा प्रभाग शिवसेनेचा तर बालेकिल्ला आहे. मात्र शहराबाहेरच्या नेत्यांचे पाठबळ घेऊन प्रभागात ताकद दाखवायला आलेल्या इतर पक्षाच्या उमेदवारांना आता स्थानिक मतदारांनी आपली स्थानिक अस्मिता स्पष्टपणे दाखवत हा बालेकिल्ला शाबूत ठेवण्याचे ठरवले आहे. शिवसेना हाच आमचा पक्ष आणि मशाल हेच आमचे चिन्ह असल्याची बाब शिवसेना उबाठा पक्षाच्या उमेदवार सत्यवान देशमुख आणि स्वप्नाली जाधव यांना मिळत असलेल्या प्रतिसादावरून जाणवत आहे.

> प्रभाग क्रमांक एक मधील जाधव परिवार हा सर्वांशी मिळून मिसळून वागणारा, माणुसकीची जाण ठेवणारा आणि प्रत्येकाला आपुलकीची वागणूक देणारा परिवार म्हणून सर्वश्रुत आहे. या परिवाराची प्रभागातील लोकप्रियता लक्षात घेऊनच जिल्हाप्रमुख गणेशदादा वानकर, जेष्ठ शिवसेना नेते दीपक गायकवाड, महिला आघाडीच्या नेत्या तथा नगरसेविका सीमाताई पाटील यांनी या प्रभागातून जाधव परिवाराच्या स्नुषा स्वप्नाली यांना उमेदवारीची महत्त्वपूर्ण संधी दिली. उमेदवारी अर्ज दाखल करताच जाधव परिवाराने या प्रभागातील प्रत्येक सर्वसामान्यांशी असलेला यापूर्वीचा जनसंपर्क मोठ्या प्रमाणात वाढवत प्रत्येकाला विश्वासात घेऊन प्रचाराची रणनीती आखली आहे.

## प्रभाग 10 मधून विजय मिळवण्यासाठी शिवसेना शिंदे पक्षाचे उमेदवार चैतन्यबापू देशमुख यांची निर्णायक मुसंडी



### सत्ताधाऱ्यांनी एकतर्फी ठरवलेल्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गट देतोय टक्कर

### मोहोळ शहराचे जेष्ठ विकास मार्गदर्शक पद्माकरआप्पा देशमुख यांची निर्णायक रणनीती सुरू

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-**सुरुवातीला एकतर्फी वाटणारी प्रभाग क्रमांक दहा मधील निवडणूक आता काटे की टक्कर ठरताना दिसत आहे. या प्रभागातील भाजपच्या उमेदवारांना प्रचारामध्ये धोबीपछाड देत ज्येष्ठ विकास मार्गदर्शक तथा शिवसेना शिंदे पक्षाचे शेलारमामा ठरलेले पद्माकरअप्पा देशमुख यांनी सर्व निवडणुकीच्या प्रचाराची सूत्रे आपल्या हातात घेत संपूर्ण प्रभागातील राजकीय संपर्क मोठ्या प्रमाणात वाढवण्यास प्रारंभ केला आहे. त्यांचे सुपुत्र तथा युवा उद्योजक चैतन्यबापू देशमुख यांच्या उमेदवारीमुळे यापूर्वीच प्रभागातील वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे. शिवसेना शिंदे पक्षाने यापूर्वीच्या नगरसेविका सुवणार्ताई गाढवे यांना उमेदवारी देत गाढवे आणि माने वस्तीच्या मतांची बेरीज करण्याचा क्षणाक्ष प्रयत्न केला आहे. त्यामुळे या प्रचारात पद्माकरआप्पा देशमुख यांच्या खांद्याला खांदा लावून तितक्याच ताकदीने आणि क्षमतेने यापूर्वीचे प्रभागाचे मार्गदर्शक आणि भाजपातून आता शिवसेना शिंदे पक्षात आलेले सुरेशदाजी गाढवे हे प्रचारात सक्रिय आहेत. त्यामुळे त्याचा मोठा फायदा गाढवे आणि देशमुख या दोन्ही उमेदवारांना होताना दिसत आहे.



> यापूर्वी मत विभागणीची शक्यता गृहीत धरत या प्रभागात शिवसेना शिंदे गटाला विजय सोपा नाही अशी धारणा प्रभागातील अनेक चाणाक्ष लोकांची होती. मात्र भाजपला तितक्याच क्षमतेने विरोध करणारा आणि निवडणुकीत सक्षम प्रचार यंत्रणा राबवणारा देशमुख परिवार निवडणुकीच्या रणांगणात उतरल्यामुळे या निवडणुकीत आता काटे की टक्कर होताना दिसत आहे. या निवडणुकीच्या प्रचाराची सर्वस्वी धुरा पद्माकरआप्पा देशमुख हे एकहाती सांभाळत असल्यामुळे प्रभागातील अनेक मोठे मासे हळूहळू देशमुखांच्या गळाला लागत असल्याचे सध्यातरी जाणवत आहे.

> या निवडणुकीच्या पडद्याआडची रणनीती जायंट किलर धोरणाने यशस्वी करत सर्व प्रचार यंत्रणा अगदी सक्षमपणे राबवणारे युवा उद्योजक आणि निवडणुकीचे मास्टर प्लॅनर प्रसाद देशमुख यांनी प्रभागातील विकासासाठी काय काय उपाययोजना करता येतील ? याशिवाय प्रभागातील सर्वसामान्यांना तात्काळ कोण कोणत्या सोयी सुविधा पुरवता येतील ? यासाठीची शिस्तबद्ध आखणी करत प्रत्येकाची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. त्यामध्ये त्यांना मोठे यश आणि प्रतिसाद मिळताना दिसत असून या सर्व प्रयत्नांची पराकाष्ठाच उमेदवार चैतन्यबापू देशमुख यांना विजयाच्या दिशेने नेताना दिसत आहे. देशमुख परिवारातील सर्व सदस्य एकदिलाने आणि प्रचंड उत्साहाने प्रभागात सर्वत्र जनसंवाद दौऱ्याच्या निमित्ताने फिरत असून त्यांना प्रभागात मोठा प्रतिसाद वाढल्याचे जाणवत आहे.

## मोहोळ नगरपरिषद निवडणुकीत विकासाचा ध्वज उंचावत रमेश बारसकर आघाडीवर; धनुष्यबाण पॅनलला प्रचंड जनाधार

### धनुष्यबाणाच्या उमेदवार सिद्धी वस्त्रे शिक्षित, संयमी आणि प्रामाणिक वृत्तीच्या असलेल्याने शहरातील महिलांकडून त्यांना दणदणीत प्रतिसाद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ नगरपरिषद निवडणुकीच्या रणधुमाळीत शहराचे राजकीय वातावरण दिवसेंदिवस तापत असताना, संपूर्ण मोहोळमध्ये आज नाव घेतले जाते ते रमेश बारसकर आणि त्यांच्या दमदार नेतृत्वाचे. शिवसेना (शिंदे गट) पॅनलच्या प्रचाराने शहरात अक्षरशः उत्साहाचे वादळ निर्माण केले असून, नागरिकांच्या प्रतिसादात वाढणारी ऊर्जा पाहता या निवडणुकीत धनुष्यबाण पॅनलने जोरदार आघाडी घेतल्याचे चित्र अधिकाधिक स्पष्ट होत चालले आहे.

शहराच्या एकूण विकासासाठी दूरगामी दृष्टिकोनातून आखलेली योजना, मोहोळच्या आजच्या समस्या ओळखून त्यावर ठोस उपाय सुचवणारी कार्यशैली आणि नागरिकांना आपलेपणाने भेटणारे नेतृत्व या तिन्ही गोष्टींनी रमेश बारसकर यांनी मोहोळकरांच्या मनात एक वेगळा विश्वास निर्माण केला आहे. सतत जनतेमध्ये राहून त्यांच्या अपेक्षा जाणून घेणाऱ्या बारसकर यांच्या ठाम व पारदर्शक भूमिकेमुळे त्यांच्याविषयीचा आदर दिवसेंदिवस वाढत असून शहरभर या नेतृत्वाचे मोठे कौतुक होत आहे.

अलिकडच्या काळात सुरू झालेली घरोघर संपर्क मोहीम ही शहराच्या राजकारणातील एक माइलस्टोन ठरली आहे. या मोहिमेत बारसकर व पॅनलमधील उमेदवार प्रत्येक घरात पोहोचून नागरिकांशी थेट संवाद साधत





आहेत. वृद्धांची काळजी, महिलांच्या अडचणी, तरुणांच्या रोजगारविषयक आकांक्षा, शहरातील पाणीपुरवठ्याची व्यवस्था, स्वच्छता आणि सार्वजनिक सुविधांची कमतरता या अनेक विषयांवर नागरिक बारसकर यांच्यासमोर अत्यंत मोकळेपणाने आपली मते मांडत आहेत. विशेष म्हणजे या समस्यांना केवळ ऐकण्यापुरते न थांबता, त्यांचे निराकरण करण्यासाठी स्पष्ट दिशा व वास्तववादी आश्वासन पॅनलने दिल्यामुळे नागरिकांमध्ये बारसकर यांच्याविषयीचा विश्वास आणखी दृढ झाला आहे.

मोहोळ शहराचा भविष्यकालीन विकास कसा असावा याची जाणीव ठेवून बारसकर यांनी केलेली शहराच्या कारभाराची आखणी अत्यंत सूक्ष्म व काटेकोर असल्याचे नागरिकांना जाणवत आहे. शहराला स्वच्छ, सुरक्षित, शिस्तबद्ध आणि आधुनिक करण्याचा त्यांचा संकल्प ही केवळ घोषणाबाजी नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून मार्ग काढण्याचे सामर्थ्य असलेला दृढनिश्चय आहे. नागरिकांच्या दाराशी पोहोचून त्यांच्या समस्यांची नोंद घेणे, त्यावर व्यवहार्य उपाय सादर करणे आणि समस्या सोडवण्यासाठी यंत्रणेला उत्तरदायी ठेवण्याच्या त्यांच्या तळमळीमुळे बारसकर यांचे व्यक्तिमत्त्व अधिक प्रभावी ठरत आहे.

नगराध्यक्षपदासाठी उभ्या असलेल्या सिद्धीताई वस्त्रे यांच्या उमेदवारीने या पॅनलची ताकद अधिक वाढली आहे. शिक्षित, संयमी आणि प्रामाणिक वृत्ती असलेल्या सूत्रे यांच्या निवडीला शहरातील महिलांकडून दणदणीत प्रतिसाद मिळत आहे. स्त्री नेतृत्व सक्षमपणे पुढे आल्यास शहराच्या प्रशासनात नव्या पारदर्शकतेची व कामकाजात काटेकोरतेची पर्वा सुरू होईल, अशी अपेक्षा नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

प्रचारादरम्यान शहरभर फिरताना दिसणारा उत्साह, कार्यकर्त्यांची अखंड धावपळ, प्रत्येक भागातून मिळणारे स्वागत आणि नागरिकांनी दिलेला निखळ पाठिंबा पाहता मोहोळमध्ये धनुष्यबाण पॅनलचा जनाधार झपाट्याने वाढताना दिसतो आहे. अनेक प्रभागांमध्ये नागरिकांनी बारसकर यांच्या कार्यशैलीचे कौतुक करत त्यांना शहराच्या भवितव्याची खात्री देणारे नेतृत्व म्हटल्याचे ऐकायला येते. शहरात चर्चेचा विषय एकाच नावाभोवती फिरताना दिसतो रमेश बारसकर म्हणजे विकासाची हमी.

निवडणुकीची तारीख जवळ येत असताना मोहोळ शहरात निर्माण झालेल्या जनभावनेने या निवडणुकीचे स्वरूप बदलून टाकले आहे. धनुष्यबाण पॅनलचा वाढता प्रभाव, नागरिकांचे उमडणारे प्रेम आणि नेतृत्वाविषयीचा अढळ विश्वास पाहता या निवडणुकीत शहराने मनोमन निर्णय घेतल्याचे स्पष्ट जाणवते.

मोहोळ आज एका नव्या अध्यायाच्या उंबरठ्यावर उभे आहे दिशादर्शक नेतृत्व, विकासाची बांधिलकी आणि जनतेचा जिव्हाळा यांचा मिलाफ झाल्यास शहराला केवळ बदल नाही, तर एक भक्कम, स्थिर आणि सुवर्णमय भविष्य मिळेल, असा दृढ विश्वास मोहोळकरांना वाटू लागला आहे.आणि या सर्व विश्वासाचा केंद्रबिंदू आहे.रमेश बारसकर आणि त्यांचा धनुष्यबाण पॅनल.

## काहीही झालं तरी यंदा नागेश थिटे यांना नगरसेवक करण्याचा शिवसैनिकांनी बांधला चंग

### जस जसे मशाल तळपायला लागली तसतसे विरोधक लागले धास्तवायला



### जिब्राईलभाई शेख यांच्या सामाजिक कार्याचा देखील शिवसेनेला होणार प्रभागात मोठा फायदा..

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** निवडणूक जाहीर झाल्यापासून शहराच्या पश्चिमेकडील प्रभाग क्रमांक आठ मधून कोणाला शिवसेनेची उमेदवारी मिळणार याबाबत मोठी चर्चा होती.गत निवडणुकीत प्रभागातील पदाधिकारी आणि मतदारांमध्ये म्हणावा तसा समन्वय शेवटपर्यंत न टिकू शकल्याने या ठिकाणी विरोधी पक्षाचा उमेदवार नगरसेवक होऊ शकला. त्यामुळे काहीही झालं तरी यावेळी नागेश थिटे यांना नगरसेवक करायचंच अशी भीष्मप्रतिज्ञा या प्रभागातील शिवसैनिकांनी केली होती. आता तीच भीष्मप्रतिज्ञा पूर्ण करण्याची वेळ या नगरपरिषद निवडणुकीच्या निमित्ताने सर्व प्रभागातील शिवसैनिकांना आणि शिवसेनेला मानणाऱ्या मतदारांना चांगलीच चालून आली आहे. ज्येष्ठ नेते दीपक मेंबर गायकवाड यांनी अगदी सावलीप्रमाणे अत्यंत लहान वयापासून शिवसैनिक म्हणून सोबत असलेल्या नागेश तथा नागजी थिटे यांना उमेदवारी देत त्यांच्या पक्षनिष्ठेला न्याय दिला. नागेश थिटे हे माजी ग्रामपंचायत सदस्य तथा शिवसेनेचे पश्चिम भागातील रामदास नाना थिटे यांचे सुपुत्र आहेत. सत्ता असो अथवा नसो सातत्याने त्यांनी शिवसेनेसोबत राहण्याची घेतलेली

भूमिका त्यांच्या निष्ठेची जणू पोचपावती देते. त्यामुळेच त्यांना उमेदवारीची संधी या प्रभागातून देण्यात आली आहे.

> नागेश थिटे हे सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवार असून ओबीसी प्रवर्गातून शबाना बाबाजान शेख या निवडणूक लढवत आहेत. शबाना यांचे सुपुत्र जिब्राईल शेख हे या प्रभागात गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असलेले नाव आहे. जिब्राइलभाई हे प्रत्येक घराघरात सामाजिक कार्याच्या रुपाने पोहोचलेले नाव आहे. त्यांची माणुसकी जपण्याची कला आणि सर्वसामान्यांना मदत करण्याची हातोटी निश्चितपणे या प्रभागातील अल्पसंख्याक समाजाच्या मतदारांमध्ये सकारात्मक प्रतिमा निर्माण करू शकली आहे. त्यामुळे जिब्राईलभाई शेख यांच्या प्रतिमेचाही मोठा फायदा शिवसेना उमेदवार नागेश थिटे आणि शबाना शेख यांना होताना दिसणार आहे. शिवसेनेच्या विजयासाठी परिवर्तनाची ही मशाल आम्ही एकदिलाने घेऊन प्रचारात सक्रिय आहोत त्यामुळे आमचा विजय निश्चित आहे.
>
> **डॉ. संग्राम गायकवाड,** युवा प्रचार प्रमुख शिवसेना, प्रभाग क्रमांक आठ



> विशेष म्हणजे शिवसेनेच्या मशाल चिन्हावर लोकनियुक्त नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवणाऱ्या अधिकृत उमेदवार उज्वला अमर कांबळे या देखील याच प्रभागाच्या मतदार आहेत. त्यामुळे नागेश थिटे यांना या प्रभागातून मोठे मताधिक्य उज्वला कांबळे यांना नगराध्यक्ष पदासाठी देखील द्यावे लागणार आहे. त्यामुळे केवळ स्वतः विजयी होण्याबरोबर प्रभागातील अन्य दोन उमेदवारांना देखील मोठे मताधिक्य देण्यासाठी नागेश थिटे यांच्या मित्र परिवाराने आणि तमाम शिवसैनिकांनी मोठी यंत्रणा कामाला लावल्याचे आतापासूनच स्पष्टपणे जाणवत आहेत.मशाल चिन्हाच्या माध्यमातून संपूर्ण प्रभागात जनसंपर्क वाढवण्यावर थिटे आणि शेख यांनी दिलेला भर निश्चितपणे त्यांच्या विजयाची नांदी देत आहे.

## मनमिळाऊ स्वभाव आणि अद्यावत प्रचार तंत्राच्या जोरावरच मेजर तानाजी माने यांची प्रभाग १० मध्ये प्रचारात सरशी

### डोअर टू डोअर प्रचारानंतर प्रभाग बैठकांवर माने परिवाराचा भर

### पक्षश्रेष्ठींनी दिलेल्या संधीचे यशस्वी होऊन सोने करण्याचा डॉ. किरण माने यांचा निर्धार

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-**प्रचार तंत्रावरच उमेदवाराचा विजय अवलंबून असतो आणि हेच अद्यावत प्रचार तंत्र प्रभाग क्रमांक दहा मधील भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार मेजर तानाजी माने आणि त्यांच्या परिवाराला अवगत आहे. उमेदवारी निश्चित झाल्यापासूनच त्यांनी डोअर टू डोअर प्रचाराबरोबर सर्वसामान्यांची वाढवलेला जनसंपर्क आता फळाला येताना दिसत आहे. पहिल्या टप्प्यात त्यांनी गाढवे वस्ती मानवी वस्तीवरील प्रत्येक सर्वसामान्यांना विश्वासात घेऊन उमेदवारीबद्दलचे मत जाणून घेत असताना प्रभागातून होणाऱ्या मतदाना बद्दलही अचूक अंदाज घेतला. याचाच मोठा फायदा माने परिवाराला आता होताना दिसत आहे पक्षश्रेष्ठी तथा माजी आमदार राजन पाटील यांनी दिलेल्या अतिशय महत्त्वाच्या संधीचे जिल्हाध्यक्ष शशिकांतनाना चव्हाण, निवडणूक प्रभारी सुशील भैय्या क्षीरसागर यांच्या विशेष सहकार्याने काहीही झालं तरी सोने करण्याची भीष्मप्रतिज्ञा माने परिवारातील युवा नेते आणि प्रभागातील भारतीय जनता पक्षाचे युवा शिलेदार डॉ. किरण माने यांनी केली आहे. त्यामुळे प्रभागातील राजकीय वातावरण निर्मितीमध्ये माने परिवार यापूर्वीही अग्रेसर होता आताही आहे आणि येत्या काळातील मतदानापर्यंतच्या वातावरणामध्ये देखील अग्रेसरच राहील असा त्यांच्या समर्थकांना ठाम विश्वास आहे. प्रत्येकाच्या मदतीला धावून जाण्याची भूमिका, मनमिळाऊ स्वभाव, सर्वसामान्यांना आपुलकी आणि जिव्हाळा प्रदान करताना आपापल्या उद्योग व्यवसायामध्ये यश मिळवूनही जमिनीवर पाऊल ठेवणाऱ्या निर्गवी माने परिवाराच्या या उमेदवारीमुळे भाजपाला हा प्रभाव ताब्यात ठेवण्यासाठी मोठी मदत होणार आहे.



> मेजर तानाजी माने यांच्या प्रचारासाठी सुनील कोकणे, नवनाथ होनमाने, दिनेश वाघमोडे, धुळदेव माने, अनिल माने, महादेव कोकणे, दिनेश माने, नितीन माने, बिरूदेव होनमाने, संतोष कोकणे, वसंत दुधाळ, कैलास माने, शहाजी माने, लक्ष्मण होनमाने, योगेश माने ,सुभाष माने, बिरूदेव माने, आप्पा माने, जगन्नाथ माने, प्रमोद माने, प्रसाद गाढवे इत्यादी भाजपाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते अहोरात्र परिश्रम घेत आहेत.
>
> माने परिवाराचा केवळ गाढवे वस्ती, माने वस्तीमध्ये जनसंपर्क आहे असे नाही, तर संपूर्ण प्रभागातील शहरी भागात म्हणजे विद्यानगर, बागवान नगर, अहिल्यानगर, गरड महाविद्यालय परिसर, कुंभार खाणी, सुभाष नगर,गणेश नगर, बरे नगर, दक्षशीला सोसायटी, चंद्रलोक पार्क या भागातही माने परिवाराने डोअर टू डोअर प्रचार करत प्रत्येकाला कमळ चिन्हावर विश्वास ठेवून मतदान करून विकासाची संधी देण्याची केलेली विनंती मतदार स्वीकारून त्यांना प्रतिसाद देताना दिसत आहेत.

## संपादकीय

# विकासाचे निकष

दक्षिण आफ्रिकेमध्ये झालेल्या जी20 शिखर परिषदेमध्ये बोलताना भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकासाचे निकष बदलण्याच्या मुद्द्यावर जोर दिला. आतापर्यंत विकासाबाबत मानल्या गेलेल्या निकषांचा फेरआढावा घेण्याची गरज असून सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासावर लक्ष केंद्रित करायला हवे, असे नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणामध्ये म्हटले आहे. या महत्त्वाच्या विषयाव्यतिरिक्त नरेंद्र मोदी यांनी अंमली द्रव्यांचा वाढता प्रसार, अंमलीद्रव्य आणि दहशतवादाचा संबंध यावरही भर दिला असला, तरी विकासाच्या निकषाचा मुद्दा जास्त महत्त्वाचा मानावा लागणार आहे. गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये जागतिक व्यासपीठावर भारत एक विकसित राष्ट्र म्हणून समोर येत असताना नवीन निकषांचा वापर करून भारताचा विकास जास्त ठळकपणे जगाच्या नजरेत आणला जावा अशीच अपेक्षा या निमित्ताने नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे.

सर्वसाधारणपणे जगातील एखादा देश किंवा अर्थव्यवस्था विकसित आहे हे जेव्हा मानले जाते तेव्हा, जे आतापर्यंतचे प्रस्थापित निकष आहेत, त्यामध्ये जीडीपीचा दर किंवा दरडोई उत्पन्न किंवा औद्योगीकरणाचा दर हे निकष समोर ठेवून तो देश किंवा ती अर्थव्यवस्था विकसित आहे, अविकसित आहे की विकसनशील आहे हे ठरवले जाते. त्याच आधारे जगामध्ये विविध अर्थव्यवस्थांची क्रमवारीही आखली जाते. आज याच निकषांच्या आधारे अमेरिका, चीन, जर्मनी, जपान, इंग्लंड आणि आता भारत या अर्थव्यवस्था आघाडीच्या अर्थव्यवस्था मानल्या जातात. केवळ जीडीपी म्हणजेच स्थूल राष्ट्रीय उत्पादनात होणारी वाढ किंवा इतर भौतिक गोष्टींमधील प्रगती यालाच विकास मानायचा का शाश्वत आणि चिरंतन विकासाला विकास मानायचा, असा प्रश्न या निमित्ताने नरेंद्र मोदी यांनी उपस्थित केलेला दिसतो.

जगभरातील सामाजिक अर्थशास्त्रज्ञ नेहमीच चिरंतन आर्थिक विकासाला प्राधान्य देत असतात. म्हणजेच सध्या वर्तमानात विकास होत असताना त्याची चुकीची फळे पुढील पिढीला भोगावी लागू नयेत अशा प्रकारे विकास केला जावा असाच विचार आतापर्यंत सामाजिक अर्थशास्त्रज्ञांनी मांडला आहे. रस्ते, पूल, बंदरे आणि इतर मोठे विकास प्रकल्प करत असताना जर पर्यावरणाला हानी पोहोचत असेल तर नंतरच्या पिढीला मोठ्या प्रमाणावर त्रास होणार आहे हाच विचार चिरंतन आर्थिक विकासाच्या कल्पनेमागे आहे. जुन्या प्रचलित आर्थिक विकासाच्या निकषांचा विचार केला तर केवळ भौतिक प्रगती केलेल्या आणि जीडीपी वाढीमध्ये सातत्य ठेवणाया देशांचा विकास झाला असा अर्थ होऊ शकतो. नरेंद्र मोदी यांना अपेक्षित असलेले विकासाचे निकष समोर आले तर एखादा देश जीडीपी किंवा दरडोई उत्पन्न ह्या निकषांवर कदाचित विकसित देश नसेल, पण शाश्वत आणि सर्वसमावेशक चिरंतन विकासाच्या निकषावर मात्र त्याला विकसित देशाचा दर्जा मिळू शकतो.

अर्थशास्त्रामध्ये वाढ आणि विकास ह्या ज्या दोन संकल्पना आहेत त्याच्या आधारे कदाचित नरेंद्र मोदी यांना विकासाचे नवीन निकष अपेक्षित असावेत. अर्थव्यवस्थेची वाढ ही नेहमी फक्त संख्यात्मक असते आणि विकास मात्र गुणात्मक असतो. कोणत्याही देशाचा गुणात्मक विकास असावा का संख्यात्मक असावा हे ठरवण्याची वेळ आता आली आहे, असे नरेंद्र मोदी यांनी या भाषणाच्या निमित्ताने म्हटले आहे. गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये ज्या प्रकारे जगाला पर्यावरणाचा फटका बसत आहे, त्याला अतिरेकी भौतिक विकास कारणीभूत आहे हेसुद्धा नाकारून चालत नाही. विकासाच्या निमित्ताने पर्यावरणाचा समतोल ढासळायला लागला की त्याचा फटका वर्तमानालाही बसतो आणि भविष्याला तर बसतोच बसतो. म्हणूनच कल्याणकारी अर्थशास्त्रज्ञ नेहमीच चिरंतन आर्थिक विकासाची संकल्पना समोर आणत असतात.

जी20 सारख्या मोठ्या व्यासपीठावर ही संकल्पना मांडून मोदी यांनी पुढाकार घेतला असला तरी त्याचा पाठपुरावासुद्धा करावा लागणार आहे. जी20 ही संघटना जगातील प्रमुख 20 श्रीमंत देशांची संघटना आहे आणि या संघटनेचे सदस्य असलेल्या बहुतेक देशांमध्ये भौतिक विकासाची पातळी अत्युच्च आहे. नरेंद्र मोदी यांना विकासाचे जे नवीन निकष अपेक्षित आहेत त्याबाबत त्यांनी आगामी कालावधीमध्येसुद्धा जगातील इतर देशांशी चर्चा करून आणि इतर व्यासपीठांवरही हाच मुद्दा मांडून याबाबत सातत्याने पाठपुरावा करण्याची गरज आहे.

अर्थात, एकीकडे विद्यमान भारत सरकारचा उद्देश भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवणे हा असतानाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा वेगळा विचार मांडला आहे हेसुद्धा लक्षात घ्यावे लागेल. चिरंतन आर्थिक विकासाच्या संकल्पनेवर जर भारताला जगातील आघाडीची अर्थव्यवस्था बनायचे असेल, तर भारतीय पातळीवरही सरकारला विविध उपायांची योजना करावी लागणार आहे हेसुद्धा या निमित्ताने लक्षात घ्यावे लागेल.

# संविधान धोक्यात आले तर देशाचा विनाश अटळ

दोन वर्षे 11 महिने 17 दिवसांत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अहोरात्र परिश्रम घेऊन तसेच अठरा-अठरा तास अभ्यास, चिंतन व मनन करून भारतीय संविधान लिहून हजारो वर्षांपासून गुलामगिरीत खितपत पडलेल्या बहुजन समाजाला त्यांचे मूलभूत हक्क व अधिकार संविधानाच्या माध्यमातून मिळवून दिले. भारतीय संविधान अस्तित्वात येण्याच्या अगोदर देशात हुकूमशाहीचा बोलबाला होता. इंग्रजांच्या जुलमी राजवटीत आपल्याला त्यांच्या इशाऱ्यावर चालावे लागायचे. जेव्हा देशात मनुस्मृती अस्तित्वात होती, तेव्हा येथील शूद्र व अतिशूद्र प्रवगार्तील लोकांना अतिशय हिन व नीच दजार्ची वागणूक दिली जात होती. मनुस्मृतीनुसार या देशाचा राज्यकारभार चालत असताना, मनुस्मृतीने येथील अस्पृश्यांना व शूद्रांना सर्व मूलभूत हक्क व अधिकार नाकारून त्यांच्यावर कमालीचा अन्याय, अत्याचार केला होता. त्यांना अतिशय अमानुषपणे वागणूक देऊन त्यांना जनावरासारखे वागवले जायचे. सार्वजनिक ठिकाणी पाणवठ्यावर शूद्रांना व मागासवगीर्यांना पाणी पिण्याची मुभा नव्हती. येथील मनुवादी व्यवस्थेनुसार त्यांना वर्गाच्या बाहेर बसून शिकावे लागायचे. उच्चवर्णीय लोक त्यांना गुलामासारखे वागवायचे आणि त्यांचा अमानुषपणे छळ करायचे. शाळा शिकत असताना बाबासाहेबांना जातीयतेचे विखारी चटके पदोपदी सहन करावे लागायचे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संध्याकाळी दिव्याखाली बसून अभ्यास करायचे आणि दिवसा शाळेत गेल्यावर वर्गाच्या बाहेर बसून अभ्यास करायचे, शाळेतील मास्तर जे शिकवतील ते नीट ध्यान देऊन ऐकायचे आणि एकेक पावाचा तुकडा खाऊन अठरा-अठरा तास अभ्यास करायचे. त्यांना येथील मनुवादी व्यवस्थेची प्रचंड चिड होती. मनुवादी व्यवस्थेने येथील मागासवगीर्यांना जनावरांपेक्षा हीन दजार्ची वागणूक दिली होती. म्हणून बाबासाहेबांनी खूप खूप शिक्षण घेऊन सर्व जाती-धमार्चा सखोल अभ्यास करून आपल्या समाजावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराला कारणीभूत असणाऱ्या मनस्मृतीला अगोदर रायगडाच्या पायथ्याशी जाळून छत्रपती शिवरायांच्या अपमानाचा बदला घेतला आणि भारतीय संविधान लिहून सर्व जाती धमार्ला घटनेच्या माध्यमातून मूलभूत हक्क व अधिकार बहाल करून दिले. हजारो वषार्पासून मागासवर्गीय समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला मनुस्मृतीचे दहन करून व भारतीय संविधान लिहून पाय बंद घातला. माणसाला जनावराचे जीवन नाकारून माणसाचे जीवन बहाल केले. हजारो वषार्पासून गुलामगिरीत खितपत पडलेल्या बहुजन समाजाला माणसात आणून सन्मानाने जीवन जगायला शिकवले. भारतीय संविधानाच्या माध्यमातून समस्त बहुजन समाजाला समता, स्वातंत्र्य, बंधुत्व बहाल करून दिले. देश स्वतंत्र होऊन व देशात लोकशाही येऊन खूप वर्षे लोटली तरीसुद्धा देशात भारतीय संविधानानुसार देशाचा राज्यकारभार खरंच चालतो का? देशात बलात्कार करणाऱ्या नराधमांना संविधानानुसार कठोर शिक्षा मिळते का? देशात शेतकरी व शेतमजूर सुखी आहेत का? सरकार संविधानानुसार देशाचा राज्यकारभार करतो का? गोरगरीब शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या पाठीमागे सरकार खंबीरपणे उभे आहे का? भारतीय संविधान पुरुषांएवढेच महिलांना सुद्धा स्वातंत्र्य देते. पण देशात किती महिला सुरक्षित आहेत? किती महिलांना बाहेर फिरायचे स्वातंत्र्य आहे? स्वातंत्र्य असूनही जर महिलांना चूल आणि मूल इतक्या पुरतेच मर्यादित ठेवत असाल तर भारतीय संविधानाचा हा घोर अपमान झाल्यासारखा आहे. देशात बलात्काराचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. कालपरवा मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात तीन वर्षीय चिमुरडीवर एका नराधमाने अमानुष व पाशवी अत्याचार करून तिला दगडाने ठेचून तिची अमानुष हत्या केली. ही लोकशाही प्रधान देशात लोकशाहीचा घोर अपमान करणारी फार मोठी धक्कादायक घटना आहे. शासन अशा नराधमाला वेळीच फाशीची कठोर शिक्षा देऊन पीडित मुलीला न्याय देऊन भारतीय संविधानाचा सन्मान का वाढवत नाही? असे अन्याय, अत्याचार देशात रोज कुठे ना कुठेतरी घडतच आहेत. परंतु आरोपीला शिक्षा मात्र होत नाही. शासन लाच घेऊन व मूग गिळून गप्प बसत आहे. आरोपी मात्र मोकाट फिरत आहेत परंतु पीडित मुलींना व महिलांना न्याय मिळत नाही. शेतकरी आत्महत्या रोज कुठे ना कुठेतरी होतच आहेत. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य हमीभाव मिळत नाही. शेतकऱ्यांच्या डोक्यावर असणारा कजार्चा भार शासन काही कमी करत नाही. आर्थिक संकटात व अस्मानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना न्याय देणे हे शासन कर्तव्य आहे परंतु शासन शेतकऱ्यांना न्याय न देता शेतकऱ्यांकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. हा भारतीय संविधानाचा एक प्रकारे अपमान ठरतो. महिलांना स्वातंत्र्य असून सुद्धा बऱ्याच घरातील पुरुष महिलांना आजही घराचा उंबरठा ओलांडू देत नाहीत. बरेच आई-वडील मुलींना उच्च शिक्षण शिकू देत नाहीत तसेच त्यांना मनावर लग्नासाठी वर शोधू देत नाहीत. राजकीय क्षेत्रात बरेच राजकारणी घोटाळे व भ्रष्टाचार करण्यात माहीर असतात. मोठमोठे घोटाळे व भ्रष्टाचार करून देखील शासन अशा घोटाळेबाज व भ्रष्टाचारी राजकारणी लोकांना कोणतीच शिक्षा देत नाही. म्हणजे शासन एक प्रकारे संविधानाचा अपमान करत आहे, असेच म्हणावे लागेल. शासन गोरगरिबांना न्याय न देता श्रीमंतांच्या बाजूने उभे राहत आहे. मोठमोठे लोक लाच देऊन आपले गुन्हे माफ करतात. परंतु गोरगरिबांना शासन न्याय देण्यात कुठेतरी कमी पडत आहे. अनेक गोरगरिबांना न्याय मिळत नाही. जो आरोपी शासनाची तिजोरी भरतो त्याला शासन माफ करत आहे. देशात असे कित्येक गोरगरीब लोक आहेत जे की, न्यायासाठी बेजार आहेत. तरीसुद्धा त्यांना शासन दरबारी न्याय मिळत नाही. हा संविधानाचा घोर अपमान होत आहे. खूप वर्षे झाली पण अजूनही डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झाली नाही. आतापर्यंत कित्येक मुलींवर व महिलांवर बलात्कार झाले आहेत, तरीसुद्धा बलात्कारी मोकाट फिरत आहेत, पण पिडीतांना न्याय मिळत नाही. त्यांना शासन पाठीशी घालून त्यांचे समर्थन करत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते संविधान कितीही चांगले असून काही फायदा नाही. ते चालवणारे सरकार किती चांगले आहे? यावरून त्याचे चांगले वाईट पण अवलंबून असते. कारण सरकार जर चांगले असेल तर त्या संविधानाची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे होते. परंतु आजकालचे सरकार भारतीय संविधानाला न्याय देण्यात कुचकामी व निष्क्रिय ठरत आहेत. भारतीय संविधानानुसार न्याय न देता देशात एक प्रकारची हुकुमशाही आणत आहेत. यामुळे लोकशाही धोक्यात येत आहे. लोकशाही धोक्यात आली आणि या देशाचा कारभार जर संविधानानुसार योग्य पद्धतीने होत नसेल तर हा देश पुन्हा एकदा हुकूमशाहीच्या वाटेवर असेल. देशात हुकूमशाही आली आणि संविधान धोक्यात आले तर हा देश सुद्धा धोक्यात येऊ शकतो आणि तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर असू शकतो. लोकांच्या भावनांचा अतिरेक होऊन देशात तिसरे महायुद्ध झाले तर देशात रक्तरंजित रणधुमाळी झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून शासनाने कायदेशीर मागार्ने देशाचा कारभार चालवून या देशातील जेवढे मोठे गुन्हेगार व आरोपी आहेत त्यांना कठोरात कठोर फाशीची शिक्षा देऊन पिडितांना न्याय द्यावा आणि भारतीय संविधानाचा सन्मान वाढवावा, नाहीतर एकदिवस भारतीय संविधान धोक्यात आले तर मग मात्र देशाचा विनाश अटळ आहे. हेच भारतीय संविधान दिनाच्या निमित्ताने माझे सांगणे आहे. भारतीय संविधान दिनाच्या सर्व भारतीयांना खूप खूप हार्दिक शुभेच्छा.

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता.अहमदपूर
जिल्हा लातूर
मो.7498715661

## प्रबोधन

# बुद्ध नवी नीति सर्वांसाठी देती

जगातून मानवी समाजाचं अस्तित्व नष्ट होऊ नये, म्हणून जगाच्या इतिहासात पहिली युद्धविरोधी चळवळ उभी करणारे दोन थोर महात्मे एकाच शतकात जन्मले. ह्यातील पहिला महापुरुष होता, पॅलेस्टाईनचा ज्यूवंशीय प्रेषित जेरिमिया आणि दुसरे होते, भारतीय महापुरुष गौतम बुद्ध! ही घटना आश्चर्यकारक निश्चित आहे. पण त्यांच्या जीवनकाळानंतर जगभर राज्यसत्ता आणि धर्मसत्तेने महात्मा जेरेमियांचा किंवा तथागत गौतम बुद्धांचा शांती संदेश दुर्लक्षित करून करोडो माणसांचं रक्त सांडून आपला राक्षसीपणा, रानटीपणा व्यक्त करावा, हा अमानुष हृदयविदारक प्रकार आहे! आज मात्र अवघं जग अणूयुद्धाच्या भीषणतेने भयभीत होऊन नाक मुठीत धरून युद्धविरोधी चळवळ उभारून जेरिमियांचं नाव घेत, गौतम बुद्धांचं स्मरण करीत त्यांच्या चरित्रातून, संदेशातून धडा घेण्याचा प्रयत्न करीत आहे. म्हणजेच थोर गौतमबुद्ध हे भूतकाळविजयी तर आहेतच, शिवाय ते भविष्यकाळविजयीसुद्धा असणार आहेत. म्हणूनच आचार्य स. ज. भागवत म्हणतात, 'ज्ञानकोशकार केतकरांनी जगाचं कालमापन करताना बुद्धपूर्व जग व बुद्धोत्तर जग असे दोनच भाग पाडले, ते यथार्थ आहेत. कारण गौतमाच्या पूर्वी एवढा मोठा ऐतिहासिक पुरुष दुसरा आढळत नाही. '

जर आज युद्ध नको या निष्कर्षापर्यंत जग आलं; तर प्रत्येक देश शस्त्रनिर्मिती, शस्त्रास्त्र संशोधन, स्वयंचलित शस्त्रशोध, अधिक संहारक बॉम्बनिर्मिती, शस्त्रास्त्र खरेदी, सैन्यवृद्धी, युद्धवीरसन्मान, संरक्षणासाठी खास आर्थिक तरतूद, अशा हिंसाधिष्ठित उपक्रमापुढे मान का झुकवत आहे? प्रत्येक सुधारलेल्या देशात युद्ध ही अत्यंत लोकप्रिय कलांपैकी एक, असं अद्यापि का मानलं जातं? अजूनही आपण नेमबाजी हा क्रीडाप्रकार मानण्याइतके हिंस्र का आहोत? युद्धात जास्त माणसं मारणारा परमवीर की परमराक्षस ?

डॉ. हेन्री थॉमस म्हणतात, 'मानवाच्या बत्थड मेंदूला हिंसा म्हणजे मूर्खपणा आहे, ही गोष्ट कळायला आणखी पन्नास हजार वर्षं लागतील.' ते पुढे म्हणतात, 'इतिहास आपणास हेच शिकवतो की, युद्ध म्हणजे खूनच नव्हे, तर आत्महत्याही आहे. प्रत्येक आक्रमक राष्ट्र शत्रूचा नाश करता करता स्वतःही नष्ट झालं आहे.' या पार्श्वभूमीवर अहिंसेचा संदेश देणारे गौतमबुद्ध हे जगाचा उद्धार करणारे एकमेव सार्वकालिक महापुरुष सिद्ध होतात.

भारत हा प्राचीन देश आहे. त्याचा इतिहास प्राचीन आहे. या देशातील शोषणजीवी शास्त्रीपंडित तर धन्य भारते जन्मः म्हणून रात्रंदिवस धन्योद्गार काढत असतात. पण स्वामी विवेकानंद परखडपणे सांगतात, 'बुद्धदेवाच्या पूर्वी होतं, तरी काय या देशात? भूर्जपत्रांच्या पोथ्यांतील काही धर्मतत्त्वं! तीही निवडक लोकांना माहीत असलेली! बुद्धांनी ती सर्वांसाठी खुली केली. ती जीवनात कशी उतरावयाची, ते दाखवलं! एका अर्थी बुद्धच वेदांताची स्फुरणमूर्ती होते.'

मध्ययुगीन संतसाहित्य सत्य, अहिंसा, सहिष्णुता, करुणा, प्रेम या तत्त्वांनी समृद्ध झालं, ते बुद्धांच्या प्रभावाने. डॉ. हेन्सी थॉमस म्हणतात, 'बुद्धधर्मी माणूस म्हणजे पृथ्वीवरचा अत्यंत सहिष्णू प्राणी होय. इतर धमीर्यांप्रमाणे बुद्ध धमार्ने कधी रक्त सांडलं नाही किंवा कोणाचा छळ केला नाही.' वारकरी संप्रदायातील संतवाङ्मय अहिंसा परमो धर्म असं मानणारं आहे, त्यामागे बुद्धांच्या अहिंसाप्रेमाची प्रेरणाच आहे.

गौतम बुद्ध देव वा ईश्वर मानत नव्हते, पण त्यांच्या भक्तांनी त्यांचाच देव, ईश्वर केला, ही वस्तुस्थिती आहे. ते आत्म्याचं अस्तित्व मानत नव्हते; पण त्यांच्या जातककथा लिहिल्या गेल्या. स्वामी विवेकानंद लिहितात, 'बुद्ध असे एकमेव महापुरुष होते की, ज्यांचं म्हणणं होतं, मी तुमचा तो ईश्वरासंबंधीच्या सिद्धान्ताचा काथ्याकूट ऐकू इच्छित नाही. आत्म्यासंबंधीचा कीस काढण्यात काय अर्थ आहे? चांगलं कर्म करा आणि चांगलं व्हा. तेच तुम्हाला आनंद देईल!'

बुद्धांनी निरीश्वरवादी विचारधारा प्रवाहित केली. याबद्दल डॉ. थॉमस लिहितात, 'प्रथम त्यांनी भटाभिक्षुकांचं बंड त्यांनी मोडलं. ते विधी, ते यज्ञ, त्या भ्रामक रूढी या सर्वांच्या मुळावर बुद्धांनी घाव घातला. देवाचे सेवकही त्यांनी दूर केले आणि देवही दूर सारले. '

भारतीय सनातनी शास्त्रीपंडित धर्मतत्त्वं लोकांपासून लपवून ठेवीत. पण बुद्ध म्हणतात, 'मी नेहमी सत्य उपदेशिलं. सत्यामध्ये गुप्त सत्य आणि प्रकट सत्य असे भेद मी केले नाहीत.' लोकांना ते सांगत, 'पोथ्यापुराणं, वाडवडिलांचं सांगणं किंवा ऐकीव गोष्टी कशावरही विश्वास न ठेवता सारासार विचार करून सर्वांसाठी हितकारक असेल त्या गोष्टीवर विश्वास ठेवा आणि त्याप्रमाणे वागा. इतरानांही तसंच वागण्यासाठी मदत करा!'

बुद्धांचा हा लोकभाषेतील उपदेश जीवनाला साधं, सोपं, सरळ स्वरूप देणारा असल्यामुळेच अमाप लोकप्रिय झाला. गौतम बुद्ध प्रेमतत्त्वाचे आद्य प्रवर्तक होते आणि आजन्म प्रसारकही होते. आचार्य स. ज. भागवत म्हणतात, ह्यमाणसाच्या जीवनाचं साफल्य त्याच्या हृदयाचा किती विकास झाला, यावर अवलंबून आहे. हृदयाची उदारता विकसित करण्यावरच जीवनाचं साफल्य आहे. बुद्धांनी मानवाच्या रूक्ष जीवनाला रसपूर्ण केलं.'

मराठीत पहिलं 'बुद्ध चरित्र' १८९८मध्ये इतिहासकार कृष्णराव अर्जुन केळुसकर यांनी लिहिलं होतं. १९०७मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मॅट्रिक पास झाल्यावर केळुसकरांनी त्यांना हे 'बुद्धचरित्र भेट' दिलं. डॉ. आंबेडकरांच्या जीवनात तो क्षण क्रांती करणारा ठरला. जवळजवळ दोन हजार वर्षं बुद्धांच्या शिकवणीचा निम्म्या मानवजातीवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम होत आहे. आता उरलेली निम्मी मानवजातही बुद्धांची ती वाणी ऐकायला तयार होत आहे. थोर विचारवंत डॉ.आ.ह. साळुंखे बुद्धांविषयीची आपली कृतज्ञता व्यक्त करताना म्हणतात, सूर्य होता आलं नाही तर सूर्यफूल व्हावं! मस्तक त्याच्याकडं असावं ! बुद्ध होता आलं नाही तरी बुद्धफूल व्हावं, हृदय त्याच्याकडे असावं, त्याच्या स्फूर्तीत जगावं !!-हे मार्गदर्शन जगणं आदर्श करणार आहे. कारण -

तथागत बुद्ध । जन्मले पृथ्वीवर ।
स्वर्गाहून सुंदर । जग झाले ॥ १
कोटी देवाहून । बुद्ध थोर होते।
माणसांचे होते । श्रेष्ठ भक्त ॥ २
अहिंसेचा मंत्र । दिला संजीवक ।
हिंस्रतेचा धाक । दूर केला ॥३
व्हावे चिरंजीवी । मानवी जीवित ।
म्हणूनी चिंतित । झाले बुद्ध ॥४
युद्धप्रेमी जगा। शिकविली शांती ।
अहिंसक क्रांती । तिचे नाव ॥५
'जगा नि जगू द्या' । आग्रह करती ।
बुद्ध नवी नीती । देती सर्वां ॥६
शांती सहिष्णुता । हाच खरा धर्म ।
अस्तित्वाचे मर्म । गौतमोक्त ॥७
आत्मा-परमात्मा । बुद्ध नाकारती ।
नव्या युगी नेती । जुन्या युगा ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# राजराजेश्वरी प्राथमिक शाळेत क्रीडा सप्ताह



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विनायक नगर येथील राजराजेश्वरी बालक मंदिर प्राथमिक शाळेत क्रीडा सप्ताहाला उत्साहात प्रारंभ झाला. सोलापूर शहर मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष विद्यानंद स्वामी,महात्मा विद्यामंदिर प्रशालेच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सविता गायकवाड, नेताजी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य रविशंकर कुंभार, सेवानिवृत्त प्राचार्य विजयकुमार हुल्ले, नेताजी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली कुंभार आदी मान्यवरांच्या हस्ते भारतीय हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद व संस्थेचे माजी सचिव कै.बसवराज कुंभार यांच्या प्रतिमेचे पूजन,दीपप्रज्वलन व गॅस फुगे हवेत सोडून क्रीडा सप्ताहाचे उदघाटन करण्यात आले. दि.२४ ते २९ नोव्हेंबर पर्यंत आयोजित क्रीडा सप्ताहात खो खो, लंगडी, संगीत खुर्ची, धावणे स्पर्धा, दोरीवरील उडी, लिंबू चमचा, स्लो सायकल, कॅरम व बुद्धिबळ आदी खेळ घेण्यात येणार असल्याचे मुख्याध्यापिका वैशाली कुंभार यांनी प्रास्ताविकेत सांगितल्या. प्रमुख अतिथी विद्यानंद स्वामी म्हणाले, विद्यार्थ्यांनी मोबाईलवरील खेळ न खेळता, मैदानावरील आपल्या आवडीचे खेळ खेळावे. गायकवाड म्हणाल्या,आरोग्य हिच आपली संपत्ती आहे.खेळातूनच आपल्याला हि संपत्ती कायम स्वरुपी मिळविता येते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण कांबळे यांनी केले तर बजरंग शिरसट यांनी आभार मानले.

# अंतर्मनाचा लेखणीशी संवाद...!

आजच्या काळामध्ये जिथे लोक दुरावले आहेत आणि एकमेकांपासून संवाद रूपात वेगळे झाले आहेत. अशावेळी मानवी मनातील भावना मनुष्याच्या मनामध्ये उफाळून येत आसतात. अशातच या विविध भावना आणि रोजच्या जीवनातील संबंध हे कोणापाशी तरी बोलण्याचे किंवा त्यातून मनाला आलाददायक वाटणारे प्रतिउत्तर हा प्रत्येक मनुष्य अपेक्षित करत आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर प्रत्येक मनुष्य आजच्या परिस्थितीशी लढत आहे भावनात्मक दृष्ट्या त्याला आधाराची गरज असताना आणि मनातील भावनांना उजाळा देण्यासाठी काय करावे हा मोठा प्रश्न प्रत्येक मनुष्याच्या मनात उभारत आहे. आज एकलकोंडे किंवा सोलो जगणे हे जास्त झाले असताना, मनातील भावना कोणासमोर उतरवायच्या हा प्रश्न प्रत्येकाच्या जीवनात येत आहे. कधी कधी मलाही हा प्रश्न पडतो की माज्या मनातील भावभावना कोणासमोर मांडाव्यात. त्यामुळे एकांतात बसून विचार केल्यावर लक्षात आले की आपण जे विचार करतो जे सुख-दुःख भोगतो ते एखाद्या कागदावर उतरवावे. आपल्या लेखणीतून आपल्याला वाटलेले आनंदाचे क्षण किंवा दुःखाची अनुभूती दोन्हीही लिहून काढावे, जेणेकरून दहा-पंधरा लोकांना आपल्या भावना सांगून किंवा अनुभव सांगून जे प्रश्न मिटत नाहीत, जे उत्तर मिळत नाही ते स्वतः मिळवावे. त्यामुळे आपल्या लेखणीतून कागदावर आपल्या मनातील छटा उतरवाव्यात त्यामुळे फायदे असे होतात की, कोणालाही आपल्या मनातील युद्ध-लढा लक्षात येत नाही. त्यामुळे कोणी आपले गैरफायदा घेऊ शकत नाही. या कागदावर उतरवलेले भावभावना किंवा कटू अनुभव या लिहून आपले मन मोकळे करता येते, पण या भावना की हा कागद कोणालाही न दाखवता तो फाडून टाकावा असे बरेच मनोवैज्ञानिक सांगतात. पूर्वी लोक डायरी द्यायचे दैनंदिन जीवनातील अनुभव लिहायचे. त्यामुळे त्यांच्या मनातील लढा भावांचे छटा किंवा अगदी दुःख हे कागदावर उतरवले जायचे आणि त्याच्या परिणाम म्हणजे मनात चाललेला विचारांचा गोंधळ कमी होणे आणि मनशांती लाभणे हा होतो. त्यामुळे आपणच आपल्या लेखनातून स्वतःच्या मनातील सुख दुःख हे कागदावर उतरवावे किंवा डायरीमध्ये लिहावे असे अनेक लोक करत असतात, कळत-नकळत यातून नवीन नवीन कल्पनाही सुचतात रोजच्या जीवनातील हा सराव नक्कीच आत्म्यातील शुद्धीकरणाचा मार्ग आहे. रोज लिहिल्याने आपल्या भावभावनांचा कोणीही गैरवापर करू शकत नाही. तर नवीन कल्पना या उदयास येतात त्यामुळे आपणच आपल्या मनाचा आरसा बनले पाहिजे आणि लेखणी हे सर्वात उत्तम पर्याय आहे. त्यामुळे जरा आयुष्यामध्ये पाच मिनिटे वेळ मिळाला, तरी रोज थोडे तरी लिखाण करावे असे मी इथे आवाहन करतो आणि त्याचा सकारात्मक परिणाम आपणास दिसून येईल हेही इथे ठामपणे सांगतो.



**ऋत्विज चव्हाण**
मो 8380800083

# युनिटी पदयात्रा उत्साहात संपन्न



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मेरा युवा भारत (युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय, भारत सरकार) यांच्यामार्फत 2025 हे वर्ष भारताचे लोहपुरुष आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रमुख शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांची 150 वी जयंती वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. याचे औचित्य साधून राष्ट्रीय एकता दिनानिमित्त 31 ऑक्टोबर ते 25 नोव्हेंबर 2025 दरम्यान संपूर्ण भारतभर जिल्हास्तरीय पदयात्रा आयोजित केल्या जात आहेत. या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यात आज पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या पदयात्रेची सुरूवात नियोजन भवन येथे उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व पदयात्रेला हिरवा झेंडा दाखवून सुरूवात करण्यात आली.

जिल्हा प्रशासन, मेरा युवा भारत, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राष्ट्रीय सेवा योजना सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली पदयात्रा नियोजन भवन, सात रस्ता येथून सुरू होऊन रंगभवन, डफरीन चौक मार्गे कामत चौक, संगमेश्वर कॉलेज रोड, सात रस्ता, नियोजन भवन या ठिकाणी या पदयात्रेची सांगता झाली.

यावेळी उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव डॉ. अतुल लकडे, जिल्हा युवा अधिकारी राहुल डोंगरे, नायब तहसीलदार उत्कर्ष देवकुळे, संचालक राष्ट्रीय सेवा योजना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर प्रो. डॉ. राजेंद्र वडजे, नदीम शेख क्रीडा अधिकारी व राजू प्याटी, राष्ट्रीय खेळाडू तसेच मेरा युवा भारत सोलापूर, जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग, महानगरपालिका, शाळा, महाविद्यालये, स्थानिक युवा संघटना, एनएसएस, एनसीसी स्वयंसेवक आणि जिल्हा आरोग्य विभाग व आरोग्य पथक यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्यालबद्दल सविस्तर माहिती देवून देशाला एकात्मतेतून सशक्त व आत्मनिर्भर बनवूया असा संदेश उपस्थित शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दिला तसेच डॉ. लक्ष्मीकांत दामा यावेळी बोलतांना म्हणाले की, सरदार वल्लभभाई पटेल यांच्या योगदानाला व कायार्ला डोळ्यासमोर ठेऊन देशाच्या उज्वल भविष्यासाठी विद्यार्थ्यांनी व युवकांनी कार्य करावे. जिल्हा युवा अधिकारी राहूल डोंगरे यांनी प्रास्ताविक भाषण करून राष्ट्रीय एकतेची शपथ दिली. कार्यक्रमाची सुरुवात देशभक्तीपर गीत व लेजीम नृत्यानी झाली तर सांगता राष्ट्रगीताने झाली.

## वात्रटिका

### प्रवृत्तीचा प्रचार

आपण काय बोलतो
याची जाणीव नसते...
पोटातील ओठांवर येते
आणि मग उणीव भासते...
किती‍ही झाकली तरी
झाकून राहत नाही प्रवृत्ती...
प्रचार राहतो बाजूला आणि
पुढे येते आत्मप्रौढी वृत्ती...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# विरोधकांच्या भूलथापांना जनता बळी पडणार नाही- आ. सचिन कल्याणशेट्टी



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** १७ वर्षे आमदारकी आणि मंत्रिपद स्वतःकडे असताना शहराचा विकास साधता आला नाही. आता आम्ही मंजूर केलेल्या पाणीपुरवठा योजनेचे श्रेय विरोधक घेत आहेत. मात्र, अक्कलकोटची जनता सर्व सत्य जाणून आहे आणि यंदाही त्यांना काहीच हाती लागणार नाही, असे प्रतिपादन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

अक्कलकोट शहरातील नगराध्यक्षपदाचे उमेदवार मिलन कल्याणशेट्टी तसेच विविध प्रभागातील नगरसेवकपदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित कॉर्नर सभेत ते बोलत होते. पुढे बोलताना आमदार कल्याणशेट्टी म्हणाले की, मागील सहा ते सात वर्षात शहर आणि तालुक्यात झालेला विकास मागील ५० वर्षातही झाला नव्हता. झालेल्या कामांमुळेच विरोधकांना पोटदुखी झाली आहे. आणि म्हणूनच आमची विकासकामेही त्यांनी केली असल्याचा खोटा दावा केला जात आहे.

ते म्हणाले की, विरोधक नुकतेच शिवसेनेत दाखल झाले असून त्यांना शहर आणि तालुक्याला मंजूर झालेल्या निधीचीही माहिती नाही. शहरासाठी मंजूर झालेला निधी तीन ते चार वर्षापूर्वीचा असून सर्व कामे पाइपलाइनमध्ये आहेत. अनेक कामे पूर्णत्वास गेली आहेत. पाणीपुरवठा योजनेचे कामही वेगाने सुरू आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. शिवसेना शिंदे गटाचे नेते सर्व कामांचे श्रेय स्वतः घेत आहेत. मात्र वस्तुस्थिती जनतेला माहीत असल्याने अशा भूलथापांना जनता बळी पडणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पुढील सहा महिन्यांत अक्कलकोटला दिवसातून दोन वेळा पाणीपुरवठा करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. या कामासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी ७५ कोटींचा निधी विशेष बाब म्हणून मंजूर केल्याचे आमदार कल्याणशेट्टी यांनी सांगितले. यावेळी नगराध्यक्षपदाचे उमेदवार मिलन कल्याणशेट्टी, महेश हिंडोळे, यशवंत धोंगडे, ननू कोरबू, बंटी राठोड, नविद डांगे, बाळा शिंदे, सुनील सिद्धे, शिवराज स्वामी, तम्मा शेळके, वरुण शेळके यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी व कर्मचारी यांनी श्रमदानातून बांधला वनराई बंधारा




**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषी महाविद्यालय बार्शी व कृषी विभाग यांच्या संयुक्त श्रमदानाने कोरफळे तालुका बार्शी येथे वनराई बंधारा बांधण्यात आला कृषी महाविद्यालयातील द्वितीय वषार्तील एन. एस. च्या विद्यार्थ्यांनी तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फूर्तपणे श्रमदानामध्ये सहभाग घेतला होता. पावसाळ्यानंतरही पाणी उपलब्ध व्हावे, विहिरींच्या पाण्याची पातळी वाढावी आणि शेतीला सिंचन मिळावे यासाठी हा बंधारा बांधला जातो. या बंधाऱ्यामुळे जमिनीत पाणी मुरण्यास मदत होण्यासाठी व भूजल पातळी मध्ये वाढ व्हावी या उद्देशाने या श्रमदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.

श्रमदानासाठी तालुका कृषी अधिकारी कोयले, कृषी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. शेंडे एस.एस, प्रा. गणेश जाधव, सहाय्यक कृषी अधिकारी पाटील तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी व्हावा यासाठी श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी बी. शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

# दि डिस्टिलर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या संचालकपदी स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांची निवड



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शंकरनगर-अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील कारखान्याच्या संचालिका कु. स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांची दि डिस्टिलर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र मुंबईच्या संचालक पदी निवड झालेली आहे.यापूर्वी त्यांनी जिल्हा परिषद सदस्य तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठच्या सिनेट संचालक म्हणून काम पाहिले आहे.

सध्या त्या शैक्षणिक, सहकार,सामाजिक व राजकीय तसेच विविध विश्वस्त संस्थाच्या माध्यमातून नेतृत्व केले असून स्वतःच्या कायार्चा वेगळा असा उत्तम ठसा उमठविलेला आहे. सहकार महर्षी कै.काकासाहेब व आक्कासाहेब यांच्या आशीवार्दाने व विजयसिंह मोहिते-पाटील, माजी उपमुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य व कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांच्या कुशल नेतृत्वाचा व मार्गदर्शनाचा लाभ होवून त्यांना विविध क्षेत्रांमध्ये काम करण्याच्या वाटा निर्माण होत आहेत.

साखर उद्योगांमधील डिस्टिलरी व्यवसाय निगडित राज्याच्या असोसिएशनमध्ये संचालक म्हणून निवड झाल्यामुळे या उद्योगातील अडीअडचणी व त्याची सोडवणूक तसेच शासकीय स्तरावरील विविध मान्यता व धोरण ठरविण्यामध्ये त्यांना सहभागी होण्याची संधी प्राप्त झालेली आहे. त्यांच्या पुढील कार्यासाठी आणखी एक संधीच दालन खुले झाले आहे. तसेच राज्यस्तरीय या असोसिएशन मध्ये सहकार महर्षी कारखान्याला एक प्रतिनिधित्व मिळालेले आहे.या निवडीने कारखाना व्यवस्थापनामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.त्याचे औचित्य साधून कारखान्याच्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये कारखान्याचे चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील व व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख तसेच संचालक मंडळाच्या उपस्थितीत त्यांचा सत्कार संचालिका सौ.सुजाता शिंदे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

यावेळी सत्कारास उत्तर देताना स्वरूपाराणी मोहिते-पाटील म्हणाल्या की,मला ज्या ज्या क्षेत्रात काम करण्याची संधी उपलब्ध झाली त्या त्या ठिकाणी मी माझ्या कामातून योगदान दिले आहे याबद्दल मी खूप समाधानी व आनंदी आहे.या मिळालेल्या संधीलाही मी न्याय देण्याचा प्रयत्न करेन.माझ्या निवडीच्या निमित्ताने माझा जो सन्मान केला केलेल्या त्याबद्दल मी आपणा सर्वांना धन्यवाद देते. याप्रसंगी कारखान्याचे संचालक लक्ष्मण शिंदे,सतीश शेंडगे, नानासाहेब मुंडफणे, ॲड. विजयकुमार पवार, रावसाहेब मगर, संग्रामसिंह जहागिरदार, रामचंद्र सिद,विराज निंबाळकर, रावसाहेब पराडे, महादेव क्षिरसागर, अमरदीप काळकुटे, भिमराव काळे,गोविंद पवार, डॉ. सुभाष कटके, रामचंद्र ठवरे, तज्ञ संचालक, ॲड.प्रकाशराव पाटील रामचंद्रराव सावंत-पाटील, कार्यलक्षी संचालक रणजीत रणनवरे शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडिया लेजर शो कमिटी संचालक बाळासाहेब माने-देशमुख,दत्तात्रय चव्हाण, राजेंद्र भोसले,धनंजय सावंत नामदेव चव्हाण, धनंजय दुपडे, अनिलराव कोकाटे, श्रीकांत बोडके, सौ.हर्षाली निंबाळकर तसेच अधिकारी उपस्थित होते.


## विकणे /भाड्याने देणे आहे

वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.

**संपर्क : डी. बी. शिंदे**
**मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३**
**पत्ताः** अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला


# श्री विठ्ठल कारखान्यावर कै. यशवंतरावजी चव्हाण यांची पुण्यतिथी साजरी



**वेणुनगर, (कटूसत्य वृत्त):-** वेणुनगर - गुरसाळे येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना येथे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व धुरंधर राष्ट्रीय नेते भारताचे माजी उपपंतप्रधान कै. यशवंतराव चव्हाण यांच्या ४१ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे पुणार्कृती पुतळ्याची विधीपुर्वक पुजा जेष्ठ संचालक श्री दिनकर आदिनाथ चव्हाण यांचे शुभहस्ते व कारखान्याचे चेअरमन, आमदार अभिजीत (आबा) पाटील व संचालक मंडळ यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

कै.यशवंतराव चव्हाण यांचा श्री विठ्ठल सह. साखर कारखान्याचे उभारणीमध्ये सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या या प्रयत्नास यश येवून गुरसाळे येथील माळरानावरती श्री विठ्ठल कारखान्याची मुहुर्तमेढ रोवून पंढरपूर तालुक्यात कृषी व औद्योगिक क्रांती घडवून आणली. कै. यशवंतराव चव्हाण साहेब हे दुरदर्शी नेतृत्व व प्रगल्भ विचारसरणी आणि विकासाला आयुष्य समर्पित करणारे, महाराष्ट्राचे सामाजीक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणीक आणि औद्योगिक क्षेत्रात परिवर्तनाची नवी दिशा देणारे दुरदृष्टी विचार होते. आधुनिक महाराष्ट्राची भक्कम पायाभरणी करणारे राज्याचे पहिले मुख्यमंत्री कै. यशवरावजी चव्हाण होते. महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी केलेले अथक प्रयत्न हीच त्यांची खरी ओळख आहे.

सदर कार्यक्रमास कारखान्याचे संचालक सर्वश्री धनंजय काळे, दत्तात्रय नरसाळे, अशोक तोंडले, सचिन पाटील, गणेश ननवरे, कार्यकारी संचालक डी. आर. गायकवाड, तसेच कारखान्याचे सभासद, कार्यकर्ते, ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार, सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्व संचालक व मान्यवरांनी याप्रसंगी कै. यशवंतराव चव्हाण यांना आदरांजली वाहून विनम्र अभिवादन केले.

# राष्ट्रवादीचे सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे तीन दिवस सोलापूर दौऱ्यावर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आगामी सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने सोलापूर शहर - जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा पवार गटाच्या वतीने जय्यत तयारी करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस सोलापूर शहर जिल्ह्याचे नूतन सहसंपर्क मंत्री तथा विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे हे २७ ते २९ नोव्हेंबर दरम्यान असे तीन दिवस सोलापूरच्या दौऱ्यावर येत आहेत, अशी माहिती शहर-जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या तीन दिवसांमध्ये प्रभाग बैठका, पदाधिकाऱ्यांच्या भेटीगाठी, विविध विकास कामांचा शुभारंभ, गप्पागोष्टी, तसेच विविध पक्षातील कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेशाचा सोहळा कार्यक्रम पार पडणार आहेत.

राष्ट्रवादीचे सहसंपर्कप्रमुख अण्णा बनसोडे यांचे गुरुवार २७ नोव्हेंबर रोजी दुपारी शासकीय विश्रामगृह येथे आगमन झाल्यानंतर तेथेच दुपारी २ वाजता सर्वप्रथम पत्रकारांशी संवाद साधणार आहेत. त्यानंतर दुपारी अडीच वाजता प्रभाग क्रमांक १५ आणि १६ येथे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी ३.५० वाजता रोजंदारी कामगारांना कायम करण्यासंदर्भात शासकीय विश्रामगृह येथे बैठक होणार आहे.त्यानंतर दुपारी ४.१० वाजता जुनी मिल कंपाऊंड येथील राष्ट्रवादी भवनमध्ये अण्णा बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमात विविध पक्षातील प्रमुखांचा पक्ष प्रवेश होणार आहे. सायंकाळी ५ वाजता मिलिंद नगर बुधवार पेठ येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार येथे पुष्पहार अर्पण करून अभिवादनाचा कार्यक्रम पार पडणार आहे. पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे व माजी उपमहापौर विष्णू निकंबे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

दुपारी साडेपाच वाजता न्यू बुधवार पेठेतील चंद्रकांत सोनवणे यांच्या निवासस्थानी पदाधिकाऱ्यांशी गाठीभेटी होऊन सायंकाळी ६ वाजता न्यू बुधवार पेठेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाच्या समोरील रस्त्यावर प्रभाग क्रमांक १, २ आणि ३ मधील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे या बैठकीला मार्गदर्शन करणार आहेत.

रात्री सात वाजता प्रभाग क्रमांक ६ व ७ मधील धरमसी लाईन येथे बैठक होणार असून त्यानंतर विविध विकास कामाचे भूमिपूजन आणि उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तर रात्री ८ वाजता प्रभाग १४ मधील विजापूर वेस येथे चौकाच्या सुशोभीकरण कामाचा भूमिपूजन समारंभ अण्णा बनसोडे यांच्या हस्ते पार पडणार आहे.राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी हा कार्यक्रम आयोजित केला आहे. रात्री ९ वाजता बाळीवेसेतील कसबा गणपती येथे अण्णा बनसोडे हे गणपतीचे दर्शन घेऊन आरती करणार आहेत. त्यानंतर आनंद मुस्तारे यांच्या निवासस्थानी ते भेट देणार आहेत. रात्री साडेनऊ वाजता शासकीय विश्रामगृह येथे अण्णा बनसोडे हे थांबणार आहेत.

शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता सह संपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांच्या दुसऱ्या दिवसाच्या दौऱ्याला दमानी नगर येथून सुरुवात होणार आहे. दरम्यान, तीन दिवसात ते शहरातील विविध पदाधिकारी यांच्या भेटीगाठी, नागरिकांशी संवाद, बैठका, विकास कामांचा शुभारंभ होणार आहे. इतर कार्यक्रम होणार आहेत, असे

शहर- जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान जेष्ठ नेते सुधीर खरटमल प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव,आनंद चंदनशिवे आणि राष्ट्रवादीचे नेते तौफीक शेख यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेला प्रदेश सरचिटणीस आनंद मुस्तारे,सचिव इरफान शेख,महिला आघाडी अध्यक्षा संगीता जोगधनकर, माजी नगरसेविका नूतन गायकवाड, नजीब शेख,चाचा सोनवणे, गणेश पुजारी, वैभव गंगणे, रुपेशकुमार भोसले, अमीर शेख, भास्कर आडकी, सुरेखा घाडगे, दत्तात्रय बनसोडे,श्रीकांत वाघमारे आदी उपस्थित होते.


## CHANGE IN NAME

I am changing my name from **ALOK MADHAVSINGH PARDESHI** to **ALOK MADHAVSING PARDESHI** for passport issuance.



(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण


# मतदान यंत्र तयार करण्याची प्रक्रीया २८ नोव्हेंबरला

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूककरीता मतदान केंद्रावर जाणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (इव्हीएम) दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजलेपासून शासकीय धान्य गोदाम, पंढरपूर येथे तयार करण्यात येणार आहेत. या प्रक्रियेदरम्यान निवडणूक लढणारे उमेदवार किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींनी मतदार यंत्र सिलिंग करण्याच्या ठिकाणी उपस्थित रहावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सीमा होळकर यांनी केले आहे.

पंढरपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता मतदान प्रक्रिया दि. ०२ डिसेंबर २०२५ रोजी होणार असून मतमोजणी दि. ०३ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार मतदान प्रक्रिया सुरक्षित व पारदर्शक होण्यात करीता सर्व मतदान केंद्राचे प्रभागनिहाय सिलिंग करण्याची प्रक्रिया पुर्ण करण्यात येणार आहे. सदर ठिकाणी प्रवेशासाठी पंढरपूर नगरपरिषद कार्यालयाच्या ओळखपत्र कक्षातून ओळखपत्र प्राप्त करून घ्यावे. ओळखपत्राशिवाय कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या


## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**



## निरामय पॅरालिसिस सेंटर

निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा ॲण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
NGO DARPAN
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये


कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करु नका खात्रीशीर उपचार



नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568

पत्ताः गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

## सुडोकु - 110

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | | | 5 | | 8 | | | 7 |
| | 8 | | 3 | | 2 | 9 | | 5 |
| | 5 | 4 | | | | | 8 | |
| | 7 | | 6 | 8 | | | 3 | 2 |
| 1 | | | | | 4 | | | 8 |
| 5 | | | 2 | 1 | 9 | | 6 | |
| | | | 9 | | 6 | | | 1 |
| 7 | 2 | 6 | | | 1 | | 4 | |
| | | 1 | 4 | 7 | | | 5 | 6 |

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# प्रत्येकाच्या हाकेला ओ देणारा प्रभागातील हाकेच्या अंतरावरील आपला माणूस म्हणजे लखनभाऊ कोळी

## लखनभाऊ कोळी यांच्या प्रचारात युवकांची संख्या लक्षणीय

### प्रचाराच्या दुसऱ्या टप्प्यात लखनभाऊ कोळी यांच्या प्रभावी प्रचारामुळे शिवसेना शिंदे पक्षाची प्रभागात सरशी



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ शहराच्या दक्षिण भागातील प्रभाग क्रमांक नऊ मधील राजकारण दिवसेंदिवस विविध मुद्द्यावर तापताना दिसत आहे यापूर्वीच्या प्रभागातील अकार्यक्षम कारभाराबद्दल असलेली नाराजी आणि कागदोपत्री उरकण्यात आलेल्या विकास कामाबद्दल असलेला असंतोष या महत्त्वपूर्ण मुद्द्यावर ही निवडणूक आता चांगलीच गाजताना दिसत आहे. शिवसेना शिंदे पक्षाने ओबीसी प्रवर्गातून या ठिकाणी युवा उद्योजक तथा कुशल युवा संघटक लखनभाऊ कोळी यांना संधी दिल्यापासून या प्रभागावर शिवसेना शिंदे पक्षाच्या धनुष्यबाणाचा प्रभाव वाढताना दिसत आहे. प्रभाग बैठका जनसंपर्क अभियान दुचाकी रॅली त्याचबरोबर डोअर टू डोअर प्रचाराच्या माध्यमातून या प्रभागातील प्रचारामध्ये लखन भाऊ कोळी यांनी मोठी आघाडी घेतली आहे. विशेष आनंदाची बाब म्हणजे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रचाराच्या घाईत असतानाही या सर्वसामान्य युवा शिवसैनिकाच्या प्रचार कार्यालयाच्या उद्घाटनासाठी आवर्जून वेळ देत यांच्या पक्षनिष्ठेचे जणू दखलच घेतली आहे. त्यामुळे लखन भाऊ कोळी यांच्या प्रचारामध्ये आता अभुतपूर्व उत्साह निर्माण झाला आहे.



या प्रभागामध्ये लखनभाऊ कोळी यांना मानणारा सर्वात मोठा वर्ग म्हणजे युवा वर्ग. लखनभाऊ कोळी यांनी गेल्या अनेक वर्षापासून प्रत्येक सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जात मदत करण्याची भूमिका घेतल्यामुळे त्यांना व्यक्तिशः फारसा विरोध कोणीच करत नाही. शिवाय त्यांच्या सर्वसमावेशक आणि प्रत्येकाला वेळ देऊन त्यांची सुखदुःख जाणून घेण्याच्या स्वभावामुळे त्यांना मानणारा मोठा वर्ग प्रभाग क्रमांक नऊ मध्ये आहे. त्यांच्या याच लोकप्रियतेचा फायदा त्यांना या निवडणुकीत आवर्जून होताना दिसत आहे. लखन भाऊ कोळी यांच्या प्रचारामध्ये असलेला युवकांचा उत्साह त्यांची लक्षणीय संख्या ही या निवडणुकीत त्यांचा प्रभाव वाढवताना दिसत आहे.

या प्रभागात स्वतः लखन कुळी हे स्थानिक रहिवाशी असल्यामुळे प्रभागात प्रत्येकाच्या हाकेला ओ देणारा हाकेच्या अंतरावरील आपला माणूस म्हणून लखन खुळी यांची छाती आहे प्रत्येकाच्या अडीअडचणीला धावून जाण्याची त्यांची भूमिका अबालवृद्धांना देत असलेला सन्मान, शिवाय युवकांना प्रत्येक क्षेत्रात मार्गदर्शन करणारा माणूस म्हणून लखनभाऊ कोळी यांना या प्रचारात मोठा पाठिंबा मिळताना दिसत आहे.

# शिवसेना शिंदे पक्षाचा धनुष्यबाण आणि प्रभागातील स्नेह परिवाराच्या पाठबळाचा सरताज सय्यद यांना होतोय मोठा फायदा

## सर्फराज सय्यद आणि लखनभाऊ कोळी या जोडीने निर्माण केला प्रचारात झंझावात



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्रमांक नऊ मधील राजकीय समीकरणाचा तंतोतंत अभ्यास करत शिवसेना शिंदे पक्षाचे युवा नेते सरफराज सय्यद यांनी आपल्या सुविदय पत्नी सरताज सय्यद यांना शिवसेना शिंदे पक्षाची उमेदवारी घेत या निवडणुकीत सर्वपक्षीयांना आव्हान दिले आहे. प्रभाग नऊ मध्ये अनेक दिग्गज पक्षांचे रथी महारथी उमेदवार असताना सर्वात जास्त चर्चा या सरताज शेख यांच्या उमेदवारीच्या आणि त्यांच्या प्रभावी प्रचाराचीच होत आहे हे कोणीही नाकारत नाही. कारण सरताज या सरफराज यांच्या पत्नी तर आहेतच मात्र या प्रभागात त्यांचा मोठा स्नेह परिवार आणि आप्तेष्ट नातेवाईक असल्यामुळे या सर्वांनीच सरताज यांच्या विजयासाठी प्रामाणिक प्रयत्न सुरू केले आहेत.



सर्फराज सय्यद हे सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असल्यामुळे साहजिकच त्यांचा मोहोळ शहरातील सर्व राजकीय समीकरणाचा अभ्यास आहे. शिवसेना शिंदे पक्षावर प्रेम करणारे विद्यमान आमदार राजू खरे यांचे निकटवर्तीय समर्थक असलेले सर्फराज सय्यद यांच्या परिवारात मिळाल्यामुळे सहाजिकच आमदार खरे यांची शहरातील मोठी ताकद सरताज यांच्या पाठीमागे उभी राहिली आहे. शिवाय राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष उमेशदादा पाटील, ओबीसी विभागाचे राज्याचे शिवसेना शिंदे पक्षाचे नेते रमेश बारसकर, शिवसेना जिल्हाप्रमुख चरणराज चवरे, ज्येष्ठ नेते पद्माकर आप्पा देशमुख यांनीही सरताज यांच्या विजयासाठी प्रचार यंत्रणा गतीने कार्यरत ठेवली आहे.

प्रभाग क्रमांक नऊच्या दक्षिण भागातील अल्पसंख्याक समाजातून देखील यावेळी काहीही झालं तरी यावेळी सरताज यांच्या रूपाने सय्यद परिवारातील महिला भगिनीचा युवा चेहरा नगरपरिषदेत विजयी करून पाठवण्याचा एकमुखी निर्णय घेतला आहे. त्यामुळे संपूर्ण प्रभागात यापूर्वीचा सय्यद परिवाराचा जनसंपर्क शिवसेना शिंदे पक्षाकडून मिळालेली उमेदवारी आणि या प्रभागात असलेला पै-पाहुण्यांचा मोठा परिवार यामुळे या प्रभागात सरताज यांची उमेदवारी शिवसेना शिंदे पक्षाच्या दृष्टीने अत्यंत जमेची बाब ठरत आहे.

# मोहोळ शहराच्या पूर्व भागातील प्रभाग क्रमांक ५ ताब्यात घेण्यासाठी शिवसैनिक लागले नेटाने कामाला

## वर्षानुवर्ष प्रभागातील समस्या न सुटल्याने यंदा जुन्या शिवसेनेची मशाल नवे परिवर्तन घडवणार

## प्रभागातील युवा नेते अविनाश क्षीरसागर यांना विश्वास

## शिवसेना उबाठाचे उमेदवार गणेश क्षीरसागर आणि सपना क्षीरसागर यांना प्रभागातून वाढता पाठिंबा

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ शहराच्या पूर्वभागातील राजकीय दृष्ट्या सातत्याने चर्चेत असलेल्या क्रमांक पाच मधील नगरपरिषद निवडणुकीमुळे आता राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रभागात भारतीय जनता पक्षाने उमेदवारीची घोषणा करण्यापूर्वीच शिवसेना मशाल पक्षाने जिल्हाप्रमुख गणेश दादा वानकर, ज्येष्ठ नेते दीपकमेंबर गायकवाड, महिला आघाडीच्या नेत्या सीमाताई पाटील यांच्या निर्णय प्रक्रियेतून अतिशय अचूक आणि चाणाक्ष रणनीती आखली आहे.

या प्रभागातून शिवसेनेचे युवानेते, अभ्यासू तथा संयमी व्यक्तिमत्व अविनाश नारायण क्षीरसागर यांच्या वहिनी सपना दादाराव क्षीरसागर, आणि सर्वसाधारण प्रवर्गातून निष्ठावंत शिवसैनिक गणेश नवनाथ क्षीरसागर यांना मशाल चिन्हावर निवडणुकीच्या रिंगणात भक्कमपणे उतरवले आहे. प्रचंड जिद्दीने आणि उमेदीच्या पाठबळावर या दोन्ही उमेदवारांनी प्रभागातील घरनाघर पिंजून काढत विरोधी सर्वच पक्षाच्या उमेदवारांना चांगलीच टक्कर दिली आहे.




शिवसेनेच्या वरिष्ठ नेते मंडळींच्या मार्गदर्शनाखाली पक्षाच्या अधिकृत उमेदवार सपना दादाराव क्षीरसागर यांनी या प्रभागातील प्रचारामध्ये सर्वसामान्यांच्या गाठीभेटी घेण्याबरोबर या प्रभागाचा येत्या काळातील विकासात्मक चेहरा मोहरा बदलण्यासाठी शिवसेनेसोबत येण्याचे आवाहन केले विविध ठिकाणी जनसंवाद दौरे प्रभाग बैठका महिलांच्या गाठीभेटी घेण्यासाठी डोअर टू डोअर प्रचाराचा उपक्रम अतिशय अभिनवपणे राबवला असून त्यामध्ये गणेश नवनाथ क्षीरसागर आणि सपना दादाराव क्षीरसागर यांना मोठा प्रतिसाद मिळत आहे.

गेल्या दहा वर्षापासून सातत्याने धक्कातंत्रासाठी प्रसिद्ध असलेल्या प्रभागात परिवर्तन घडवत शिवसेनेचा भगवा फडकवण्याचा दृढ निश्चय या प्रभागातील शिवसैनिकांनी पदाधिकाऱ्यांनी आणि मतदार बंधू भगिनींनी केल्याचे या प्रभागाचे शिवसेनेचे युवा नेते अविनाश क्षीरसागर यांनी प्रचारा दरम्यान माध्यमांशी बोलताना सांगितले. यावेळी ते म्हणाले या प्रभागाने अनेकांना संधी दिली. अनेकांनी सत्तेचा लाभ देखील घेतला. मात्र ज्या प्रभागाने संधी दिली त्याच प्रभागाला त्या सत्ताधारी पक्षाचे नेते विसरले. त्यामुळे या प्रभागातून यावेळी रस्ते, पाणी, आरोग्य आणि अन्य सुविधांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मतदार बंधूभगिनी निश्चितपणे शिवसेनेच्या मशाल चिन्हाचीच निवड करतील असा विश्वासही यावेळी अविनाश शिरसागर यांनी व्यक्त केला.

# सुपुत्र जिब्राईलभाई शेख यांच्या सामाजिक योगदानामुळे प्रभाग क्रमांक ८ मध्ये शबाना बाबाजान शेख यांच्या प्रचाराला अभुतपूर्व पाठिंबा

## शेख परिवाराचा या प्रभागातील भाईचारा ठरतोय मोहोळ शहराच्या पश्चिम भागात कौतुकास पात्र

## शेख परिवारातील सदस्यांसह प्रभागातील स्नेहपरिवारही प्रचारात सहभागी

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्रमांक आठ मध्ये समावेशित असलेल्या मेहबूबनगर मध्ये जिब्राहीलभाई शेख नावाच्या युवकाने गेल्या दहा ते बारा वर्षात सामाजिक क्षेत्रात दिलेले उल्लेखनीय योगदान या नगरपरिषद निवडणुकीत शहराच्या पूर्वेकडील भागात कौतुकास पात्र ठरतच आहे. त्यांच्या परिवारातील मातोश्री शबाना बाबाजान शेख या नगरपरिषद निवडणुकीत ओबीसी महिला प्रवगार्तून प्रभाग क्रमांक आठ मधून शिवसेनेच्या मशाल चिन्हद्वारे निवडणूक लढवत आहेत. जिल्हाप्रमुख गणेशदादा वानकर, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते तथा किंगमेकर व्यक्तिमत्व दीपकमेंबर गायकवाड, शिवसेनेच्या महिला आघाडीच्या नेत्या नगरसेविका सीमाताई पाटील यांच्या निर्णय प्रक्रियेतून शबाना शेख यांना उमेदवारी प्राप्त झाली आहे.

शबाना शेख यांच्या प्रभागातील निर्णायक वोट बँकेमुळे शिवसेनेला यंदा हा गड सर्वसाधारण उमेदवार नागेश थिटे यांच्या विजयासह सहजरित्या सर करणे शक्य होणार आहे. शिवाय नगराध्यक्षपदाच्या उमेदवार उज्वला अमर कांबळे यांनाही या प्रभागातून निर्णय मताधिक्य मिळणार आहे. त्यामुळे या प्रभागावर शिवसेनेचा मशाल चिन्हाचा झेंडा फडकवण्याचे शिवसैनिकांचे स्वप्न यंदाच्या निवडणुकीत निश्चितपणे पूर्ण होणार आहे.



आपल्या मातोश्रींच्या प्रचार प्रचारार्थ निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या शेख परिवाराचा जनसंपर्क निश्चितपणे संपूर्ण प्रभागात कौतुकास पात्र ठरत आहे. शबाना शेख यांच्या प्रचारा दरम्यान या परिवाराला प्रभागातून मोठा सकारात्मक विचारांचा पाठिंबा मिळतोय ही निश्चितपणे सुखावह बाब ठरत आहे. शबाना बाबाजान शेख यांच्या परिवारातील त्यांचे सुपुत्र जमीर शेख, बिलाल शेख, जिब्राईलभाई शेख, शोएब शेख हे चारही बंधू आपल्या मातोश्रींच्या विजयासाठी संपूर्ण प्रभागात संपर्क ठेवण्याबरोबर प्रचाराच्या रणधुमाळीमध्ये मोठी आघाडी घेताना दिसत आहेत. आणि त्यामध्ये त्यांना मोठा पाठिंबा मिळाल्याचे जाणवत आहे.

# विकासाची गंगा फक्त आम्हीच आणू शकतो- प्रशांत परिचारक

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर नगरपालिका निवडणूक 2025 या निवडणुकीमध्ये भाजपा व श्री पांडुरंग परिवार यांच्या सहयोगाने पंढरपूर नगरपालिकेची निवडणूक ही लढवली जात आहे. या निवडणुकी मधून आम्ही पुढील काळामध्ये पंढरपूर शहराचा कायापालट करण्याचे उद्देशाने भावीक भक्तांना सुख सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भाजपा सरकार व श्री पांडुरंग परिवार हा वचनबद्ध आहे विकासाची गंगा फक्त आम्हीच आणू शकतो, कारण देशांमध्ये तसेच महाराष्ट्र राज्यामध्ये भाजपाचे सरकार असून या सरकारच्या माध्यमातून पंढरपूर शहराला यापूर्वी देखील कोट्यावधी रुपयाचा निधी मिळालेला आहे व त्या निधीमधून असंख्य विकास कामे आम्ही केलेली आहेत. येणाऱ्या काळामध्ये देखील पंढरपूर शहराचा कायापालट करण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून पंढरपूर शहरातील मतदार बंधू-भगिनींना पंढरपूर शहराच्या विकासासाठी भाजपाच्या कमळावर पुढील चिन्हाचे बटन दाबून नगराध्यक्ष पदासाठी सौ शामलताई लक्ष्मण शिरसाट व भाजपाचे सर्व प्रभागांमधील 36 उमेदवारांना प्रचंड मताने विजयी करावे असे आव्हान विधान परिषदेचे माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी आज रोजी प्रभाग क्रमांक तीन व प्रभाग क्रमांक चार या प्रभागामधून प्रचार फेरी काढून सर्वसामान्य जनतेच्या भेटीगाठी घेऊन प्रशांतराव परिचारक आणि आमदार समाधान दादा अवताडे यांनी सर्वसामान्यांच्या अडीअडचणी ऐकून घेतल्या व त्या सोडवण्यासाठी आम्ही आता प्रयत्न करणार आहोत असे देखील अभिवचन त्यांनी मतदार बंधू-भगिनींना दिले.



प्रभाग क्रमांक तीन व चार या ठिकाणी भाजपाच्या वतीने प्रचार रॅलीची फेरी काढून या प्रभागांमध्ये भाजपाचे कमळ चिन्ह हेच सर्वत्र दिसून येत होते संपूर्ण शहर हे भाजपाच्या कमळाने फुलून गेल्याचे चित्र आज रोजी दिसून येत होते.

या प्रचार फेरीमध्ये नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ शामल लक्ष्मण शिरसाट व सर्व प्रभागांमधील भाजपचे उमेदवार व असंख्य कार्यकर्ते माता भगिनी तरुण उपस्थित होते.

# प्रभागातील सर्वांगीण विकासाचे प्रश्न सोडवण्यासाठी भाजपाकडून आपण निवडणुकीच्या रणांगणात : निलावती डोके

## प्रभागातील विकासाभिमुख मतदारांच्या पाठबळावर विजय संपादन करणार

## निलावती डोके यांनी व्यक्त केला विश्वास

## मातोश्रींच्या प्रचारासाठी डोके परिवाराचे दोन कर्तबगार सुपुत्र प्रभाग नऊच्या मैदानात



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** भारतीय जनता पक्षाने दिलेल्या उमेदवारीच्या संधीचे सोने यापुढील काळातील प्रभागातील सर्वांगीण विकासाचे प्रश्न सोडवण्यासाठी निश्चितपणे मी करणार आहे. ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार राजन पाटील, जिल्हाध्यक्ष शशिकांतनाना चव्हाण, माझे बंधू तथा आमच्या डोके परिवाराचे राजकीय मार्गदर्शक बाळासाहेब (भाऊ) गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणूक मोठ्या मताधिक्याने जिंकून कमळ चिन्हाच्या विकासधारेच्या वैचारिक पाठबळावर या प्रभागावर भारतीय जनता पक्षाचा झेंडा आम्ही निश्चितपणे फडकवू असा विश्वास प्रभाग क्रमांक ९ भाजपाच्या अधिकृत उमेदवार निलावती प्रभाकर डोके यांनी प्रचारादरम्यान व्यक्त केला.

प्रभाग क्रमांक नऊ मधील समर्थ नगर न्यू समर्थ नगर क्रांतीनगर विश्वनाथ नगर या परिसरातील महिला भगिनींशी संवाद साधण्यासाठी आयोजित जनसंवाद रॅली दरम्यान पक्षाच्या उमेदवार निलावती डोके बोलत होत्या. याप्रसंगी त्यांच्या समवेत वर्षा विजय डोके, महिला संघटक निर्मलाताई डोंगरे, पूनम प्रवीण डोके, दिपाली प्रभाकर डोके रूपाली प्रमोद डोके, प्रतीक्षा प्रदीप डोके, मनीषा डोके, लक्ष्मी डोके या डोके परिवारातील महिला भगिनीं उपस्थित होत्या.

प्रभाग क्रमांक दहा मध्ये भारतीय जनता पक्षाच्या सर्वसाधारण प्रवर्गाच्या अधिकृत उमेदवार निलावती द्रोणाचार्य डोके यांच्या प्रचारार्थ ठिकठिकाणी जनसंवाद दौरे प्रचार रॅली आणि प्रभाग बैठकांना जोर आला आहे. त्यांचे बंधू बाळासाहेब गायकवाड विष्णुपंत गायकवाड यांनी पूर्ण रणनीती आपल्या हातात घेतली आहे. या प्रभागातील वातावरण निर्मितीमध्ये त्यांचे सुपुत्र तथा युवा उद्योजक प्रवीणनाना डोके प्रभाकर दादा डोके तसेच माजी नगरसेवक आणि प्रवीण नाना डोके यांचे बंधू प्रमोद बापू डोके, विक्रांत गायकवाड, वैभवदाजी गायकवाड, गणेश गायकवाड यांनी अतिशय शिस्तबद्ध प्रचार यंत्रणा सक्रिय करत प्रभागातून मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळवला आहे.

या प्रचारामध्ये भाजपच्या डोके परिवाराने डोके वस्तीची निर्णायक वोट बँक शाबूत तर ठेवलीच आहे, मात्र शहराचा समावेश असलेल्या या प्रभागातील दाट लोकवस्तीच्या परिसरात देखील डोके परिवारातील सदस्यांनी घरोघरी संपर्क करत मतदारांना कमळ चिन्ह हे विकासाचे चिन्ह असल्याची बाब सहजरीत्या पटवून दिली आहे.

# नगरपंचायत निवडणुक ; सुनील तटकरे यांची किसन जाधवांनी घेतली भेट



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (अजित पवार) चे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि महिला प्रदेशाध्यक्ष तसेच महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कुडूर्वाडीत प्रचारसभेसाठी दाखल झाले. या वेळी पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी दोन्ही मान्यवरांचे स्वागत केले नगरपंचायतीत राष्ट्रवादीचे सर्वाधिक नगरसेवक निवडून यावेत, यासाठी हा दौरा आयोजित करण्यात आला होता. यावेळी पक्षाच्या ग्रामीण व शहरी संघटनांना बळकट करण्यावर भर देण्यात आला. सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने महत्त्वाचा निर्णय घेत प्रदेशाध्यक्ष तटकरे यांनी माहिती दिली की, सोलापूर जिल्ह्याचे सहसंपर्क मंत्री व विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांचा 27 ते 29 नोव्हेंबरदरम्यान सोलापूर शहर दौरा निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत शहर जिल्हाध्यक्ष, शहर कार्यकारिणी, प्रदेश पदाधिकारी आणि कार्यकर्त्यासोबत बैठका घेऊन महापालिकेत अधिकाधिक नगरसेवक निवडून आणण्याची रणनीती अंतिम केली जाणार आहे.

या दौऱ्याचे काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना सुनील तटकरे यांनी किसन जाधव यांना देत, पक्ष संघटन मजबूत करण्याला गती मिळाली आहे. याप्रसंगी करमाळ्याचे माजी आमदार संजय मामा शिंदे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष उमेश पाटील, सोलापूर शहर राष्ट्रवादी सरचिटणीस संतोष उर्फ ऋतिक गायकवाड, कुडूर्वाडी राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष दत्ता काकडे, पवन बेरे आदींची उपस्थिती होती.

# वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडून वन विभागाचा आढावा

**नागपूर (कटूसत्य वृत्त):-** वन विभागाशी संबंधित विविध विषयांचा आढावा घेण्यासाठी 25 नोव्हेंबर रोजी नागपूर येथील हरिसिंग सभागृहात वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक झाली. या प्रसंगी पेंच व्याघ्र प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या समुदायाभिमुख उपक्रमांचे तसेच त्या माध्यमातून तयार होणाऱ्या विविध वस्तूंचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमाचे सर्वांनी स्वागत केले.

या बैठकीस प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) श्रीनिवास राव; प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) व मुख्य वन्यजीव रक्षक एम. श्रीनिवास रेड्डी तसेच इतर वरिष्ठ वन अधिकारी उपस्थित होते. स्थानिक समुदायांचे जंगलावरचे अवलंबित्व कमी करणे आणि त्यांना पयार्यी रोजगार उपलब्ध करून देणे या उद्देशाने पेंच व्याघ्र प्रकल्पांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या प्रदर्शनाद्वारे वनमंत्री नाईक यांना स्थानिक समुदाय आणि महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंची माहिती देण्यात आली